# महाराष्ट्र विधानपरिषद

## चौथे (हिवाळी) अधिवेशन, २०२०

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या केळी पिकासाठी फेर निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत

**(१) ४८३७ (११-११-२०२०). श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री पीक विमा योजना ही केंद्र आणि राज्य शासनाच्यावतीने संयुक्तपणे राबविण्यात येत असून या योजनेच्या निधीत केंद्र आणि राज्य शासनाचे संयुक्त योगदान आहे, याबाबत निविदा जारी करताना केळी पिकासंदर्भात राज्य शासनाने सन २०२०-२०२१ ते २०२२-२०२३ या तीन वर्षाच्या कालखंडासाठी दावे निकाली काढण्यासंदर्भातील निकषांमध्ये केलेले बदल हे उत्पादकांवर अन्याय ठरणारे व शेतकऱ्यांपेक्षा पीक विमा कंपन्यांना लाभ मिळवून देणारे असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी विभागाने व संबंधित विमा कंपनीने केळी पीक विमा योजनेसाठी मागील पाच वर्षात कधीही पूर्ण न झालेले तापमानाचे निकष लावले आहेत, हवामानातील बदलाच्या नोंदी किंवा किमान कमाल

तापमानाच्या नोंदी झालेल्या नाहीत, तापमानाचे निकष पूर्ण होत नसल्याने शेतकऱ्यांना फक्त विमा रक्कम भरावी लागत असून भरपाई मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी दिनांक ९ ऑक्टोबर, २०२० रोजी एका पत्राव्दारे मा.मुख्यमंत्री यांना शेतकऱ्यांच्या होणाऱ्या नुकसानीची बाब लक्षात आणून दिली असून सदर निविदा रद्द करून फेर निविदांची प्रक्रिया राबविण्याबाबत विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या केळी पिकासाठी फेर निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२६-११-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) आंबिया बहार सन २०२०-२०२१ करीता सद्य:स्थितीतील निविदा रद्द करुन नवीन निविदा प्रसिध्द करण्यासाठी विशेष बाब म्हणून मान्यता देणेबाबत प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आला असता, केंद्र शासनाने त्यांचे दिनांक ११ सप्टेंबर, २०२० व ६ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या पत्रान्वये आंबिया बहार सन २०२०-२०२१ मधील द्राक्ष तसेच स्ट्राबेरी या फळपिकासाठीचा पहिला हवामान धोका दिनांक १६ ऑक्टोबर, २०२० पासून सुरु होत असल्याने पुर्न-निविदा काढण्यास परवानगी दिलेली नाही. मात्र पुढील वर्ष सन २०२१-२०२२ करीता सुधारित प्रस्ताव सादर करणेबाबत निर्देश दिले आहेत.

तसेच पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेची प्रभावी अमंलबजावणी व हवामान धोके निश्चित करण्यासाठी आयुक्त, कृषी यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ११ नोव्हेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठित करण्यात आली आहे. सदर समितीने अधिसुचित

फळपिकांसाठी हवामान विभागनिहाय, जिल्हानिहाय व्यवहारीक हवामान धोके (शास्त्रोक्त स्पष्टीकरण व संशोधन संदर्भासह) निश्चित करुन शासनास शिफारस करण्याचे निर्देश दिले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पॅरामिलिटरी फोर्सच्या आजी-माजी सैनिकांचे घरपट्टी माफ करण्याबाबत

**(२) ४८३९ (११-११-२०२०). श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने दिनांक ९ सप्टेंबर, २०२० रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये राज्यातील आजी-माजी सैनिकांचे घरपट्टी माफ करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, देशाच्या अंतर्गत कायदा-सुव्यवस्था व बाह्य सीमा सुरक्षेत तैनात असणाऱ्या पॅरामिलिटरी फोर्सच्या आजी-माजी जवानांना सदरहू शासन निर्णयाचा लाभ मिळणार नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, १) BSF-भारत पाकिस्तान बांगलादेश सीमा, २) SSB-भारत-भूतान-नेपाळ सीमा, ३) ITBP-भारत-चीन तब्बल सीमा, ४) Assam Raifal-भारत म्यानमार सीमा, ५) CRPF-भारतीय आंतरिक सुरक्षा कायदा व सुव्यवस्था, उग्रवाद, नक्षलवाद सुरक्षा व ६) CISF-भारतीय औद्योगिक सुरक्षा या सर्व फोर्सच्या अनेक जवानांनी देशाच्या सुरक्षेसाठी प्राणाची आहुती देऊन देशाचे रक्षण केले असून ह्या पॅरामिलिटरी फोर्सच्या आजी-माजी जवानांसाठी उपरोक्त शासन निर्णयाचा लाभ मिळावा याबाबतचे निवेदन अनेक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निर्णय घेऊन पॅरामिलिटरी फोर्सच्या आजी-माजी सैनिकांचे घरपट्टी माफ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२७-११-२०२०) :** (१) होय.

(२) होय.

सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.न्याय-२०१४/कोर्ट-९/(प्र.क्र.२४४/१४)/२८, दिनांक ११ सप्टेंबर, २०१४ नुसार (Ex-CAPF) कर्मचारी हे माजी सैनिक नसल्याने त्यांना माजी सैनिकांना देण्यात येणाऱ्या सोई-सुविधा, लागू होत नाहीत.

(३) होय.

(४) नागरी स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रातील घरपट्टी माफ करणे याबाबत नगर विकास विभाग तसेच ग्रामीण स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रातील मालमत्ताची घरपट्टी/मालमत्ता कर माफ करणे ही बाब ग्रामविकास विभागाच्या अधिकार कक्षेतील असल्याने सदर निवेदने संबंधित विभागास पाठविण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मराठवाड्यात कपासी पिकांवरील बोंड अळी व दहीया रोगाचा प्रादुर्भाव रोखण्याबाबत

**(३) ४८४४ (११-११-२०२०). श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.महादेव जानकर, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यात यावर्षी १४ लाख ६१ हजार हेक्टरवर कपाशीची लागवड झाली असून कपाशी पिकांवर माहे जुलै ते ऑक्टोबर, २०२० मध्ये काही भागात गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव व तद्‌नंतर दहीया रोगामुळे कपाशी उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद कृषी विज्ञान केंद्राच्या तज्ञांनी परिक्षेत्रात केलेल्या पाहणीनुसार दहीया रोगाचा प्रादुर्भाव अनेक शेतात ३० ते ५० टक्क्यांपर्यंत झाला असून सदरहू प्रादुर्भाव वाढल्यास कपाशीचा हंगाम वाया जाण्याची भिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मराठवाड्यातील कपासी पिकांवरील बोंड अळी व दहीया रोगाचा प्रादुर्भाव रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२७-११-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

मराठवाड्यातील लातूर व औरंगाबाद विभागात १५ लाख ०८ हजार हेक्टरवर कापूस पिकाची लागवड झाली असून लातूर विभागात माहे जुलै ते ऑक्टोबर, २०२० या कालावधीमध्ये कापूस पिकावर दहीया रोगाचा प्रादुर्भाव कोणत्याही जिल्ह्यांमध्ये आढळून आलेला नाही. नांदेड, परभणी व हिंगोली जिल्ह्यामध्ये शेंदरी बोंड अळीचा प्रादुर्भाव अल्प प्रमाणात आढळून आला. तसेच औरंगाबाद जिल्ह्यामध्ये काही ठिकाणी दहीया रोगाचा प्रादुर्भाव दिसून आला होता.

(२) हे खरे नाही.

या वर्षी सष्टेंबर ते ऑक्टोबर मधील सततच्या पावसामुळे औरंगाबाद जिल्ह्यातील काही परीसरातील शेतामध्ये २०-२५ टक्के प्रमाणात कपाशीवर दहीया रोगाचा प्रादुर्भाव दिसुन आला होता. परंतु शास्त्रज्ञांनी दहीया रोगाचा प्रादुर्भाव कमी करण्याकरीता प्रतिबंधात्मक व उपचारात्मक उपाययोजनांची माहिती शेतकऱ्यांना वेळेमध्ये दिल्यामुळे यावर नियंत्रण ठेवणे शक्य झाले.

(३) शेतीशाळेमार्फत जनजागृती, अनुदानावर फेरोमन सापळे, आपत्कालीन किटकनाशके निविष्ठा पुरवठा, प्रचार व प्रसिध्दीसाठी माहिती पुस्तिका, एम किसान पोर्टल मार्फत सल्ला प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या मोबाईलवर पाठवून व गाव पातळी बैठका घेऊन वृत्तपत्र इत्यादींच्या माध्यमातुन शेतकऱ्यांना वेळेवर मार्गदर्शन व सल्ला दिल्यामुळे, गुलाबी बोंड अळी व दहीया रोगाचा प्रादुर्भाव कमी करण्याकरीता प्रतिबंधात्मक व उपचारात्मक उपाययोजना वेळेमध्ये केल्याने प्रादुर्भाव नियंत्रणात ठेवणे शक्य झाले.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्हा परिषदेच्या सदस्यांने महिलेचा विनयभंग केल्याबाबत

**(४) ४८४८ (१२-११-२०२०). डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हा परिषदेच्या सदस्याने महिलेला भररस्त्यात बेदम मारहाण करुन तिचा विनयभंग केल्याची घटना माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी बोईसर पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (०२-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या तक्रारीवरून दोन आरोपींविरूध्द बोईसर पोलीस ठाणे येथे भा.दं.वि.सं. कलम ३५४ (ब), ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये गु.र.क्र. २४०/२०२० दाखल करण्यात आला आहे.

सद्य:स्थितीत सदर गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात पोलीस विभागाची ऑनलाईन तक्रार करण्याची सेवा सुरु करण्याबाबत

**(५) ४८६६ (१२-११-२०२०). श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलिसांची ऑनलाईन तक्रार करण्याची सेवा बंद असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस ठाण्यामध्ये पोलिसांकडून मिळणाऱ्या गैरवर्तणुकीच्या वागणुकीमुळे अनेक नागरीक वेबसाईटवर ऑनलाईन पध्दतीने तक्रार करण्याचा प्रयत्न करत असतात परंतु, वेबसाईटवर ऑनलाईन तक्रारीचे ऑप्शन रजिस्टर होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ऑनलाईन तक्रार सेवा सुरळीत चालण्याकरीता आयुक्त व डीसीपी यांना वारंवार सूचना देवूनही ऑनलाईन तक्रार सेवा सुरळीत सुरु झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात पोलीस विभागाची ऑनलाईन तक्रार करण्याची सेवा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (२७-११-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) ऑनलाईन तक्रार सेवा सुरळीत चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेचे अनुदान देण्याबाबत

**(६) ४८७५ (११-११-२०२०). श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.महादेव जानकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेचे अनुदान देण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या पत्रान्वये शासनाला केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ३१ मार्च, २०२० अखेरचा निधी राज्य शासनाने वितरित न केल्यामुळे शेतकऱ्यांना अनुदान मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचे अनुदान शासनाकडून कधीपर्यंत वितरित करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेचे अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (२७-११-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेचे अनुदान देण्याच्या मागणीसंदर्भात लोकप्रतिनिधीचे दिनांक १३ ऑक्टोबर, २०२० रोजीचे पत्र प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. तथापि, दिनांक २८/०५/२०२० व दिनांक २९/०८/२०२० ची पत्रे प्राप्त झाली आहेत.

(२) हे खरे नाही.

योजना सुरु झाल्यापासून दिनांक ३१ मार्च, २०२० अखेर एकूण रुपये ५९५८.४३४ लाख एवढा निधी वितरित करण्यात आला आहे.

(३) व (४) सदर योजनेंतर्गत तीन वार्षिक हप्त्यामध्ये अनुदान देण्याची तरतूद आहे. त्यामुळे सन २०१८-२०१९ मध्ये लागवड केलेल्या फळबागांसाठी तिसऱ्या हप्त्याच्या व सन २०१९-२०२० मध्ये लागवड केलेल्या फळबागांसाठी दुसऱ्या हप्त्याच्या देय निधीसाठी सर्वसाधारण व अनुसूचित जमाती प्रवर्ग मिळून एकूण रुपये २१००.०० लाख एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून अनुसूचित जाती प्रवर्गाचा निधी उपलब्ध करुन देण्याची विनंती सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाडा (जि.पालघर) येथे बियाणांमध्ये भेसळ करणाऱ्या महाबीज कंपनीवर कारवाई करण्याबाबत

**(७) ४९२३ (११-११-२०२०). श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) येथे सन २०२० च्या खरीप हंगामात श्रुती कृषी सेवा केंद्रातून खरेदी करण्यात आलेल्या महाबीज या कंपनीच्या 'सुवर्णा' व 'जया' वाणांच्या भात बियाणांमध्ये भेसळ निघाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याचे दिनांक १३ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बियाणांमध्ये भेसळ करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२७-११-२०२०) :** (१) व (२) महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित (महाबीज) अकोला यांनी पालघर जिल्हयात खरीप २०२० हंगामात भारतीय बीज प्रमाणीकरणाचे किमान मानकानुसार व बीज यंत्रणेने प्रमाणित केलेले धान पिकाचे विविध वाणांचे बियाणे पेरणीकरीता उपलब्ध करुन दिले होते.

श्री.प्रकाश लक्ष्मण पाटील, रा.सापणे, बु.ता.वाडा, जि.पालघर यांनी धानाच्या जया वाणामध्ये तर श्री.मोहन विष्णू पाटील यांनी सुवर्णा वाणामध्ये भेसळ असल्याबाबत तक्रार केली होती. सदर तक्रारीची त्वरीत दखल घेऊन तालुकास्तरीय बियाणे तक्रार निवारण समितीने तक्रारग्रस्त क्षेत्राची प्रत्यक्ष तपासणी केली असता सुवर्णा वाणामध्ये मागील वर्षाच्या कर्जत-३ या वाणाचे लागवडीमुळे व जया वाणामध्ये देवभात व डांगीभाताची दिसून आलेली भेसळ ही शेतकऱ्यांने लेंडी खताचा वापर केल्याने लेंडी खतातून आल्याबाबतचा समितीने निष्कर्ष काढलेला आहे.

सदर शेतकऱ्यांव्यतिरीक्त वाडा तालुक्यामधुन इतर कोणत्याही शेतकऱ्यांची महाबीजच्या बियाणांबाबत तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील मच्छिमारांना कर्जमाफी देण्याबाबत

**(८) ४९७२ (११-११-२०२०). श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांसाठी जाहीर करण्यात आलेल्या रुपये २ लाखापर्यंतच्या कर्जमाफी योजनेच्या धर्तीवर राज्यातील मच्छिमारांना देखील कर्जमाफी देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे, प्रस्तावाबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू प्रस्तावार निर्णय घेऊन राज्यातील मच्छिमारांना कर्जमाफी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (२७-११-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बोईसर (जि.पालघर) येथील डोंगराळ भागात बेकायदेशीररित्या खोदकाम सुरु असल्याबाबत

**(९) ५०१६ (११-११-२०२०). डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.रविंद्र फाटक, श्री.जयंत पाटील, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर (जि.पालघर) येथील नागझरी, निहे, किराट, लालोंडे या डोंगराळ भागात जिलेटीन व डिट्रेनोटरचा वापर करुन बेकायदेशीररित्या खदान माफियांकडून खोदकाम सुरु असल्याचे माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खदानीला परवानगी व रॉयल्टी देतांना वन विभागाची परवानगी घेणे बंधनकारक असतानाही नियमांचे उल्लघंन करुन सर्रासपणे खदानमाफियांकडून खोदकाम करुन माती उत्खनन सुरु असल्याने खदानमाफियांवर महसूल प्रशासनाकडून कोणती कारवाई करण्यात येत नसल्याने महसूल विभागाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महसूल बुडवून बेकायदेशीर माती उत्खनन करणाऱ्या खदानमाफियांवर तसेच दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२७-११-२०२०) :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

पालघर तालुक्यातील मौजे नागझरी, लालोंडे, किराट व निहे परिसरात तहसिलदार, पालघर यांचेकडून विविध विभागाच्या परवानग्या घेवून १० खदानधारकास दगड उत्खननाकरीता तात्पुरते परवाने देण्यात आले असून त्यापासून शासनास ४६ लक्ष एवढे स्वामित्वधन प्राप्त झाले आहे. सदरील क्षेत्र वन विभागाच्या अखत्यारीत मोडत नसल्याने वन विभागाची परवानगी घेण्याची आवश्यकता दिसून येत नाही. उक्त नमूद परवानाधारक यांनी अवैध उत्खनन केल्याचे आढळून आले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वर्धा जिल्ह्यातील सिंदी (रेल्वे) येथे महिलेवर अत्याचार झाल्याबाबत

**(१०) ५०८१ (१२-११-२०२०). श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्यातील सिंदी (रेल्वे) येथील सेससुला येथे फार्महाऊसवर एका विवाहित महिलेला नोकरीचे आमिष दाखवून तिच्यावर ६ नराधमानी अत्याचार केल्याची घटना दिनांक २९ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अत्याचार करणाऱ्या गुन्हेगारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (०२-१२-२०२०) :** (१) सदर घटना सिंदी (रेल्वे) येथे घडलेली नसून मौजा बाळापूर शिवार सावंगी (मेघे) हद्दीतील आहे. ही घटना दिनांक २७ जून, २०२० रोजी घडली आहे.

(२) उक्त प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून पोलीस स्टेशन सावंगी (मेघे) येथे अपराध क्र. २२९/२०२० कलम ३७६ (ड), ३४२, ५०६ भादंवि अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील नमूद आरोपी क्र. १ ते ६ यांना अटक करण्यात आली असून सध्या आरोपी हे न्यायालयीन कोठडीत आहेत. आरोपींविरूध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले असून सद्य:स्थितीत सदर गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यात बोगस बियाणे विक्री करणाऱ्या कंपनीवर कारवाई करण्याबाबत

**(११) ५१११ (११-११-२०२०). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पेरलेले सोयाबीन बियाणे बोगस निघाल्यामुळे शेतकऱ्यांच्या सोयाबीन पिकाची उगवण न झाल्याने अशा कंपन्याविरुध्द तक्रार करून आर्थिक नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी/तक्रार परभणी जिल्ह्यातील १२ हजार पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे नोंदविल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोगस बियाणे उत्पादकांविरुध्द गुन्हे नोंदविण्यात आले आहेत काय, या प्रकरणी संगनमत करुन लूटमार करणाऱ्या कृषी विभागातील अधिकारी व गुणनियंत्रण अधिकारी यांच्या गैरकारभाराची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, किती शेतकऱ्यांना प्रत्यक्षात आर्थिक मदत करण्यात आली आहे, याबाबत तालुकानिहाय माहिती काय आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने परभणी जिल्ह्यातील बोगस बियाणे विक्री करणाऱ्या दोषी कंपनी व जबाबदार शासकीय अधिकारी यांचेवर कारवाई करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२७-११-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) परभणी जिल्ह्यात एकूण १४६५३ तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या. तपासणीअंती तालुकास्तरीय समितीने १४४५७ तक्रारींमध्ये सदोष बियाणे असल्याचा अहवाल दिला आहे. तसेच, या तक्रार अहवालाच्या अनुषंगाने ३ कंपन्याविरुध्द पोलीस गुन्हे दाखल केले असून बियाणे नियम १९६८ च्या नियम २३-A नुसार २७ न्यायालयीन दावे व बियाणे कायदा १९६६, बियाणे नियम १९६८ व बियाणे नियंत्रण आदेश १९८३ मधील तरतूदीनुसार अप्रमाणित बियाणांबाबत ९९ न्यायालयीन दावे दाखल करण्यात आले आहे.
(३) व (४) परभणी जिल्ह्यातील परभणी, मानवत, पाथरी, पालम, सेलु, सोनपेठ, जितुर, गंगाखेड, पुर्णा अशा ९ तालुक्यामधील १९८ शेतकऱ्यांना रुपये १२,७४,५००/- रोखीने आणि ५३ शेतकऱ्यांना बियाणे स्वरुपात नुकसान भरपाई खाजगी कंपनी व महाबीज यांनी दिलेली आहे.

तसेच सदोष बियाणे प्रकरणी शेतकऱ्यांना नुकसान भरपाईबाबत जिल्हा ग्राहक मंचाकडे दावा दाखल करणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबत

**(१२) ५१३४ (११-११-२०२०). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महसूल विभागातील कर्मचाऱ्यांची नियमित पदोन्नती आणि कालबध्द पदोन्नती तसेच अव्वल कारकून संवर्गातून नायब तहसिलदार तसेच नायब तहसिलदार संवर्गातून तहसिलदार अशी पदोन्नती रखडल्याबाबत परभणी येथील जिल्हा महसूल संघटनेने सन २०२० मध्ये वा त्यादरम्यान विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे लेखी मागणी केली आहे, तसेच औरंगाबाद विभागातील तहसिलदार ते उपजिल्हाधिकारी पदोन्नतीच्या यादीतील ६० ते ७० टक्के तहसिलदारांची विभागीय चौकशी सुरु असल्याने मागील ११ वर्षांपासून पदोन्नत्या रखडल्या असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद विभागातील तहसिलदार व नायब तहसिलदार यांच्यावरील आरोपांच्या विभागीय चौकशी व पोलीस प्रकरणाबाबतची प्रकरणे एक वर्षाच्या आत निकाली काढावीत असा नियम असूनही चौकशी वेळेत पूर्ण होत नसल्याने सर्व तहसिलदार व नायब तहसिलदार संवर्गातील अधिकाऱ्यांच्या पदोन्नत्या रखडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महसूल कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबत विविध आंदोलने करण्यात आली असून महसूल कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, याबाबत जिल्हानिहाय सविस्तर माहिती काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन औरंगाबाद महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२७-११-२०२०) :** (१), (२), (३), (४) व (५) परभणी जिल्हा (गट-क) महसूल कर्मचारी संघटना परभणी यांचे अशा आशयाचे निवेदन विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना प्राप्त झाले आहे.

तहसिलदार संवर्गातून उपजिल्हाधिकारी संवर्गामध्ये पदोन्नती देण्यासाठी सन २०१९ ते आजअखेर १७७ तहसिलदारांची पात्रता तपासण्यात आली असून, त्यापैकी १२५ तहसिलदारांना उपजिल्हाधिकारी संवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे. पदोन्नत झालेल्या १२५ अधिकाऱ्यांपैकी २२ अधिकारी औरंगाबाद विभागातील आहेत. तसेच, औरंगाबाद विभागातील ७ अधिकाऱ्यांना या कालावधीमध्ये विभागीय चौकशी/फौजदारी गुन्हा या प्रकरणामुळे पदोन्नती देण्यात आलेली नाही.

तसेच, दिनांक १३/०९/२०१९ च्या आदेशान्वये १३ अधिकाऱ्यांना नायब तहसिलदार संवर्गातून तहसिलदार संवर्गामध्ये पदोन्नती देण्यात आली आहे. नायब तहसिलदार संवर्गातील २ अधिकाऱ्यांना या कालावधीमध्ये विभागीय चौकशी/फौजदारी गुन्हा या प्रकरणामुळे पदोन्नती देण्यात आलेली नाही.

अव्वल कारकून व मंडळ अधिकारी संवर्गातील कर्मचाऱ्यांना नायब तहसिलदार संवर्गात पदोन्नती देण्यासाठीचा निवडसूची २०१९ बाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडून शासनास प्राप्त झालेला असून, सदर प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे.

उक्तप्रमाणे पदोन्नतीबाबत कार्यवाही करताना सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येत असून एखाद्या अधिकाऱ्याविरुध्द विभागीय चौकशी/फौजदारी कार्यवाही प्रलंबित असल्यास अथवा संबंधित अधिकारी शिक्षेच्या अंमलाखाली असल्यास सदर अधिकाऱ्याला पदोन्नतीसाठी पात्र ठरवून विभागीय चौकशी/फौजदारी कार्यवाही/शिक्षेचा अंमल संपुष्टात आल्यानंतर त्याला पदोन्नती देण्यात येते.

---

## परभणी जिल्हयात क्रीडांगण निर्माण करण्याबाबत

**(१३) ५१३८ (११-११-२०२०). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनपेठ, परभणी, पाथरी, गंगाखेड व पालम (जि.परभणी) या तालुक्याच्या ठिकाणी क्रीडांगणासाठी जागा उपलब्ध नसल्याने क्रीडांगण तयार होऊ शकले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्रीडांगणासाठी जागा उपलब्ध करून घेणे व क्रीडांगण निर्माण करणे यासाठी जिल्हाधिकारी, परभणी यांच्यास्तरावरून कार्यवाही करण्यात आली आहे काय, तालुकानिहाय थोडक्यात माहिती काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने परभणी जिल्हयात क्रीडांगण निर्माण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (०३-१२-२०२०) :** (१) होय.

(२) व (३) तालुका क्रीडा संकुल, सोनपेठ साठी पाटबंधारे विभागाची जागा उपलब्ध झाली आहे. तालुका क्रीडा संकुल परभणीसाठी कृषी विद्यापीठाची जागा उपलब्ध झाली आहे.

तालुका क्रीडा संकुल, पाथरी साठी जागा उपलब्ध झालेली नाही. तालुका क्रीडा संकुल गंगाखेड आणि क्रीडा संकुल, पालम साठी खाजगी संस्थेची जागा उपलब्ध करून घेण्याबाबतची कार्यवाही जिल्हा क्रीडा अधिकारी, परभणी यांचेस्तरावरून सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील कोळीवाड्यांच्या सीमांकनाबाबत

**(१४) ५१६७ (११-११-२०२०). श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १०१ ला दिनांक १२ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने केलेल्या १३ कोळीवाड्यांच्या सीमांकनावर मुंबईतील आद्य नागरिक असलेल्या कोळी नागरिकांनी हरकती घेतल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे, कोळीवाड्यांची विस्तारलेली घरे, दाटीवाटीची वस्ती आणि व्यवसायाच्या जागा निश्चित करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, यासंदर्भात मच्छिमार नेते यांनी केलेल्या मागण्यांचे स्वरुप काय आहे, याबाबत शासनाची भूमिका काय आहे, मुंबईतील कोळीवाड्यांसाठी स्वायत्ता कोस्टल कौन्सिल स्थापण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबईतील कोळी वाड्यांचे सीमांकन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (०१-१२-२०२०) :** (१), (२), (३) व (४) उपसंचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांनी दिनांक २४/१२/२०१८ व १२/०२/२०१९ च्या पत्रान्वये मुंबई उपनगरामधील १४ कोळीवाड्यांचे सर्वेक्षण व सीमांकनाबाबतची कार्यवाही करून शासनास अहवाल सादर केला. महसूल विभागाने यापैकी मुंबई उपनगरातील १२ कोळीवाड्यांचे सीमांकन गावठाणाच्या हद्दीमध्ये करण्याच्या शिफारशीसह सदर कोळीवाड्यांचे सर्वेक्षण व सीमांकनाबाबतचा अहवाल व नकाशे नगर विकास विभागास विकास आराखड्यात समावेश करण्याकरीता उपलब्ध करून देण्यात आले. त्यानुषंगाने नगर विकास विभागाने सदर कोळीवाड्यांचे सर्वेक्षण व सीमांकनाबाबतचा अहवाल व नकाशे बृहन्मुंबई महानगरपालिकेस अग्रेषित केले असता, संबंधित कोळीवाड्यांच्या सीमांकनाचे नकाशे बृहन्मुंबई महानगरपालिकेने विकास

नियोजन आराखडा-२०३४ च्या जी.आय.एस. प्रणालीवर प्रतिबिंबित करण्याची कार्यवाही करून, त्यावर जनतेकडून सूचना/हरकती १ महिन्यात सादर करण्यासाठी दिनांक ०२/१०/२०२० च्या वृत्तपत्रात जाहिरात देण्यात आली होती. त्यानुषंगाने शासनास तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेस सूचना/हरकती प्राप्त होत आहेत. प्राप्त झालेल्या सूचना/हरकती यांच्या अभ्यास करण्यात येवून पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

मुंबईतील कोळीवाड्यांसाठी स्वायत्ता कोस्टल कौन्सिल स्थापण्याबाबतच्या मागणीचे मच्छिमार नेते यांच्याकडून कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही.

(५) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## वरळी (मुंबई) पोलीस वसाहतीची दुरुस्ती करण्याबाबत

**(१५) ५१८० (१२-११-२०२०). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वरळी पोलीस कॅम्प येथील पोलीस वसाहतीतील खोल्यांचे तसेच गॅलरीतील स्लॅब कोसळण्याच्या घटना वारंवार होत असल्याने पोलीस वसाहतीची दुरवस्था झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरळी पोलीस वसाहतीची दुरुस्ती करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे अनेकदा तक्रारी करुनही त्याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वरळी पोलीस वसाहतीची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (२७-११-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे. वरळी पोलीस कॅम्प येथील वसाहतीत जुन्या व नवीन वसाहतीच्या मिळून एकूण ८७ इमारती असून माहे सप्टेंबर, २०२० मध्ये काही खोल्यांच्या छताचा सिमेंट गिलावा निखळून पडण्याच्या घटना घडल्या आहेत. अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ज्या ज्या ठिकाणी गिलावा कमकुवत झाला आहे असा कमकुवत भाग सुरक्षेच्या दृष्टीने पाडण्यात आलेला आहे.

(२) व (३) वरळी पोलीस कॅम्प वसाहतीतील दहा इमारतींच्या दुरुस्तीसाठी रुपये १६,१९,५३,६८२/- इतक्या खर्चाच्या अंदाजास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असून त्यापैकी रुपये ३,५०,००,०००/- इतका निधी सार्वजनिक बांधकाम विभागास वितरित केलेला आहे. उक्त निधीमधून आठ इमारतींचे दुरुस्तीचे कामकाज पूर्ण झालेले असून दोन इमारतींचे दुरुस्ती कामकाज अंतिम टप्प्यात आहे.

वरळी पोलीस कॅम्प वसाहतीतील ६० इमारतींच्या दुरुस्तीसाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्याची बाब कार्यवाहीधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील मच्छिमारांना नैसर्गिक आपत्तीत मिळणाऱ्या मदतीत वाढ करण्याबाबत

**(१६) ५२०३ (१२-११-२०२०). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नैसर्गिक आपत्तीत नदी-नाल्यांच्या पाण्यात वाहून मृत्यू झाल्यास रुपये ४ लाख नुकसान भरपाई तर समुद्राच्या पाण्यात बुडून मृत्यू झाल्यास रुपये २ लाख नुकसान भरपाई देण्यात येत आहे, केंद्र आणि राज्य शासनाच्या सन २०१५ च्या नैसर्गिक आपत्तीच्या आदेशातील रुपये २ लाख फरकाच्या निर्णयामुळे आदिवासी बांधव आणि मच्छिमारांच्या कुटुंबांना

नुकसान भरपाईची अल्प मदत मिळत असल्याचे निदर्शनास आले आहे, तसेच कोकणात दिनांक ३ जून, २०२० रोजी झालेल्या चक्रीवादळामुळे मच्छिमार कोळी बांधवांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शासनाने केलेली आर्थिक मदत अपुरी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकणातील नुकसानग्रस्त मच्छिमारांसाठी विशेष आर्थिक पॅकेज देणार आहेत काय, सदर नुकसान भरपाईचे अंदाजित खर्चाचे तपशील काढले आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील मच्छिमार कृती समिती, अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समिती व काही सहकारी संस्थांनी तसेच लोकप्रतिनिधींनी मच्छिमारांवर होणाऱ्या अन्यायकारक तरतुदी शासन निर्णयातून वगळून सुधारित पाच लाखाच्या नुकसान भरपाईचा निकष मच्छिमारांना लावण्यासंदर्भात मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.मत्स्यविकास मंत्री यांनी देखील रुपये पाच लाखांची नुकसान भरपाईची मागणी त्यांच्या दालनात झालेल्या बैठकीत मान्य केल्याचे सांगून संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देऊनही मात्र या आश्वासनाची पूर्तता वर्षभराच्या कालावधी नंतरही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मच्छिमारांना नैसर्गिक आपत्तीत मिळणारी नुकसान भरपाईची मदत वाढवून रुपये पाच लाख करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (२७-११-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

महसूल व वन विभागाच्या दिनांक १३/०५/२०१५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये अपादग्रस्त मृत व्यक्तीच्या कुटुंबियाना रुपये ४.०० लक्ष इतकी मदत अनुज्ञेय आहे. तेथे सागरी किंवा भूपृष्टीय मच्छिमार असा भेदभाव केलेला नाही.

महसूल व वन विभागाच्या दिनांक १३/०५/२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार अनुज्ञेय रक्कमा अपूऱ्या वाटल्याने महसूल व वन विभागाने दिनांक २४/०६/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये एक विशेष बाब म्हणून वाढीव दराने मदत देण्यास मान्यता दिली असून, वाढीव दराने अनुज्ञेय होणारा मदत निधी दिनांक ०४/०८/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये वितरित केलेला आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत मच्छिमार मृत पावल्यास अथवा कायमचे अपंगत्व आल्यास रुपये ५.०० लक्ष आणि अंशत: अपंगत्व आल्यास रुपये २.५० लक्ष इतकी नुकसान भरपाई देण्यास दिनांक १७/११/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील पशुवैद्यकिय रुग्णालयास दर्जावाढ देण्याबाबत

**(१७) ५२१५ (११-११-२०२०). श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील 'ब' श्रेणीमध्ये ४२८ पशुवैद्यकिय रूग्णालयाच्या दर्जावाढीचा प्रस्ताव पशुसंवर्धन आयुक्तालयाच्या माध्यमातून शासनाकडे सादर केला असल्याचे दिनांक ६ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पशुवैद्यकिय रूग्णालयास दर्जावाढ देण्याच्या प्रस्तावास शासन मान्यता देऊन पशुवैद्यकिय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरणार आहेत काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पशुवैद्यकिय रुग्णालयास दर्जावाढ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (२७-११-२०२०) :** (१) राज्यातील ४२८ पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ चे रुपांतरण करुन पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ मध्ये दर्जावाढ करणेबाबत आयुक्त, पशुसंवर्धन कार्यालय, पुणे यांचेकडून दिनांक १६/०५/२०१८ च्या पत्रान्वये प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला आहे.

(२) सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने वित्त विभागाने काही मुद्दे उपस्थित केलेले असून, त्यानुषंगाने आयुक्त पशुसंवर्धन, पुणे कार्यालयाकडून माहिती तथा अभिप्राय प्राप्त करून घेण्यात येत आहेत. तथापि, राज्यात उद्भवलेल्या कोविड-१९ च्या प्रादुर्भावानंतर सन २०२०-२०२१ या वित्तीय वर्षात होणाऱ्या अर्थव्यवस्थेवरील परिणामाबाबत वित्त विभागाने दिनांक ४/०५/२०२० च्या शासन निर्णयान्वये उपाययोजना सूचविलेल्या असून, त्या अंतर्गत सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग वगळता कोणत्याही विभागाने कोणत्याही प्रकारची नवीन पदभरती करु नये असे निर्देश दिलेले आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मराठा क्रांती मोर्चातील आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याबाबत

**(१८) ५२१८ (१२-११-२०२०). श्री.महादेव जानकर, श्री.रामनिवास सिंह :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठा क्रांती मोर्चातील आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत किती आंदोलकांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्यात आले आहे काय, सदर आंदोलनात मृत्यूमुखी पडलेल्यांच्या वारसांना शासकीय सेवेत सामावून घेण्यात आले आहे काय, उपरोक्त कार्यवाही कधीपर्यंत होणे अपेक्षित आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (०१-१२-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) मराठा आरक्षण आंदोलकांवरील पोलीस महासंचालक यांनी शासनास शिफारस केलेल्या एकूण ३२८ प्रकरणांपैकी ३२१ प्रकरणे मागे घेण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. ३ प्रकरणे "अ" वर्ग समरी करण्यासाठी मा.न्यायालयास विनंती करण्यात आलेली आहे. उर्वरित ४ खटले मागे घेण्याची कार्यवाही चालू आहे.

या आंदोलनादरम्यान उस्मानाबाद व परभणी जिल्ह्यात अनुक्रमे ०२ व ०१ असे एकूण ०३ आंदोलक मृत्यूमुखी पडले आहेत, त्यांच्या वारसांना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामध्ये नोकरी देण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ०९/१०/२०२० रोजी आदेश दिलेले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी दिनांक २८/०९/२०२० रोजी क्षेत्रिय कार्यालयांना आदेश दिले असून क्षेत्रिय कार्यालयाकडून मृतांच्या वारसांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार अनुकंपा तत्वावरील पदांमध्ये नेमणूक देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## मिरा-भाईंदर (जि.ठाणे), वसई आणि मुंबई येथे अंमली पदार्थाची खरेदी-विक्री करणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याबाबत

**(१९) ५२२० (१२-११-२०२०). श्री.महादेव जानकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रविंद्र फाटक, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर (जि.ठाणे) येथे अंमली पदार्थांची विक्री होत असून गोल्ड-नेस्ट, भाईंदर येथे पोलिसांनी २ किलो गांजासह इतर अंमली पदार्थ जप्त केल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रीय अंमली पदार्थ विरोधी पथकाने (एनसीबी) वसई आणि मुंबईत कारवाया करुन कोट्यवधी रुपयांचे कोकेन, पीसीपी, एसडीए, एमडी, चरस आदी अंमली पदार्थ जप्त केल्याचे दिनांक १६ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कारवाईत अटक करण्यात आलेल्यांमध्ये बालाजी टेलिफिल्म कंपनीच्या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मिरा-भाईंदर (जि.ठाणे), वसई आणि मुंबई येथे अंमली पदार्थाची खरेदी-विक्री/तस्करी करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (०३-१२-२०२०) :** (१) सप्टेंबर, २०२० मध्ये असे निदर्शनास आले नाही. तथापि, माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये ३ किलो ३५३ ग्रॅम वजनाचा गांजा नवघर पोलीस स्टेशनच्या हद्दीत पोलिसांकडून जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यांतील आरोपी हे कारागृहात आहेत.
(२) होय, हे खरे आहे.

भारत सरकारच्या स्वापक नियंत्रण ब्यूरो, मुंबई झोनल युनिट यांनी प्रश्नाधीन कालावधीत २ गुन्हयांची नोंद केली असून ५ व्यक्तींना अटक केली आहे.
(३) होय, हे खरे आहे.

भारत सरकारच्या स्वापक नियंत्रण ब्यूरो, मुंबई झोनल युनिट यांनी केलेल्या कार्यवाहीमध्ये बालाजी टेलिफिल्म कंपनीच्या एका कर्मचाऱ्यास अटक करण्यात आली आहे.
(४) मिरा-भाईदर येथील गुन्ह्यातील सर्व आरोपी न्यायालयीन कोठडीत असून यासंदर्भातील पुढील चौकशी सुरु आहे.

तसेच अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गु.अ.वि. गुन्हे शाखा, मुंबई यांच्याकडून सन २०२० मध्ये एकूण ३० गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यामध्ये ३९ आरोपींताना अटक करण्यात आली आहे.

तसेच अंमली पदार्थ विरोधी कक्षातील साध्या वेषातील अधिकारी/ अंमलदार हे अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या इसमांवर पाळत ठेवून, गुप्त बातमीदारांमार्फत माहिती प्राप्त करुन कारवाई करत असतात. तसेच अंमली पदार्थांचे होणाऱ्या दुष्परिणामाबाबत वेळोवेळी शाळा, महाविद्यालय येथे जनजागृती अभियान कार्यक्रम राबविण्यात येतात.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे शहरात अंमली पदार्थ तस्करी व खरेदी-विक्री करणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याबाबत

**(२०) ५२२९ (१२-११-२०२०). श्री.महादेव जानकर, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण (जि.पुणे) परिसरात पिंपरी-चिंचवड पोलीस दलातील अंमली पदार्थ विरोधी पथकाने सापळा रचून रुपये २० कोटींचा अंमली पदार्थांचा माल जप्त केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नशेसाठी गांज्याचा वापर करणाऱ्या तरुणांची संख्या स्मार्ट शहरांमध्ये वाढत असून एकट्या पुण्यामध्ये गेल्या दोन वर्षभरात पोलिसांनी सुमारे दीड कोटींचा ८१२ किलो गांजा जप्त केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कर्नाटक व ओडिशा या राज्यातून अनेक स्मार्ट शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात गांजा येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अंमली पदार्थ तस्करी व खरेदी-विक्री करणाऱ्या दोषींवर कारवाई करुन पुणे शहरात अंमली पदार्थ तस्करी व खरेदी-विक्री रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (०३-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस स्टेशन व अंमली पदार्थ विरोधी पथकाकडून सन २०१९ व ऑक्टोबर, २०२० पर्यंत ६०७ किलो ३५२ ग्रॅम ८५९ मिलीग्रॅम रुपये १,१४,२३,७३४/- किंमतीचा गांजा जप्त करण्यात आला आहे.

तसेच पिंपरी-चिंचवड आयुक्तालयाकडील अंमली पदार्थ विरोधी पथकाने गेल्या दोन वर्षात ८०५.४६९ किलोग्रॅम वजनाचा रुपये १,९२,३३,३१५/- किंमतीचा गांजा जप्त केला आहे.

तसेच अंमली पदार्थ विरोधी कायदा, १९८५ अन्वये अंमली पदार्थांची विक्री करण्याऱ्याविरुध्द कायद्यात कडक तरतुदी असून सदर तरतुदींप्रमाणे त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येते. अंमली पदार्थांची विक्री व प्रसार थांबविण्याकरीता परिसरात प्रभावी गस्त घालून तसेच गुप्त खबऱ्यांमार्फत व लोकांना विश्वासात घेवून विविध पातळींवरुन अंमली पदार्थ सेवनार्थी व विक्रेते यांच्याबाबत माहिती मिळवून कारवाई करण्यात येते. तसेच समाजात तरुण तरुणींमध्ये अंमली पदार्थांच्या सेवनांच्या दुष्परिणाबाबत जनजागृती होण्याकरीता विविध शाळा कॉलेज या ठिका तज्ञांमार्फत कार्यशाळा आयोजित केल्या जातात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विदर्भात स्वतंत्र कृषी विद्यापीठ स्थापन करण्याबाबत

**(२१) ५३०२ (११-११-२०२०). श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रामदास आंबटकर, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अकोला येथील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ विदर्भातील ११ जिल्ह्यासाठी एकच विद्यापीठ असल्याने उत्पादनक्षम वाण, पूरक तंत्रज्ञान देण्यास अपयशी ठरत असून या भागातील शेतकऱ्यांना पारंपारिक पीक पध्दतीवरच अवलंबून रहावे लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भात स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याबाबत मराठवाडा कृषी विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरु बी.वेंकटेश्वरलू यांचा सकारात्मक अहवाल शासनास पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विदर्भात पीक पध्दती, वातावरण तुलनेत वेगळे असताना या भागाकरीता स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०१-१२-२०२०) :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) तत्कालीन मा.मंत्री (कृषी व फलोत्पादन) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १९/०४/२०१७ रोजी आयोजित बैठकीमध्ये डॉ.वेंकटेश्वरलू समितीच्या शिफारशीनुसार डॉ.पंदेकृवि, अकोला विद्यापीठाचे विभाजन करुन मूल, जि.चंद्रपूर येथे नवीन कृषी विद्यापीठ स्थापन करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली आहे.

यानुसार विद्यापीठस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्ह्यात वाळू उत्खनन सुरु करण्याबाबत

**(२२) ५३०६ (११-११-२०२०). श्री.रामदास कदम :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली, खेड, मंडणगड तालुक्यात वाळू उत्खनन बंद असल्याने प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजनेतील घरकुलांची कामे अपूर्णावस्थेत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रत्नागिरी जिल्ह्यात वाळू उत्खनन सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२७-११-२०२०) :** (१) व (२) महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड यांचेकडून प्राप्त झालेल्या हातपाटीच्या गटातील काही उपगट प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजनेतील लाभार्थी यांचेसाठी राखीव ठेवण्यात आलेले होते. त्याप्रमाणे झिरो रॉयल्टी पासेस तहसिलदार मंडणगड, खेड व दापोली यांना वितरित करण्यात आले होते.

तथापि, गटविकास अधिकारी मंडणगड व दापोली यांनी उपरोक्त लाभार्थ्यांकरीता वाळूची मागणी न केल्याने सदर झिरो रॉयल्टी पासेस संबंधित तहसिलदार यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात परत केले आहेत.

सन २०२०-२०२१ करीता रत्नागिरी जिल्ह्यात शासनाच्या घरकुल योजनेकरीता ०४ उपगट राखीव ठेवण्यात आले आहेत. तसेच जिल्ह्यातील सर्व तहसिलदार यांना संबंधित गटविकास अधिकारी यांचेकडून लाभार्थी यांची यादी प्राप्त करुन घेवून झिरो रॉयल्टी पास वितरित करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रिपब्लिक टीव्हीच्या संपादकांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याबाबत

**(२३) ५३२८ (१२-११-२०२०). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर हत्याकांड आणि वांद्रे स्थानकात स्थलांतरित श्रमिकांनी केलेली गर्दी या विषयावर रिपब्लिक वाहिनीवरील चर्चासत्रात अर्णब गोस्वामी यांनी आक्षेपार्ह विधाने केली होती, याबाबत सोशल मिडियावरही जातीय तणाव व धार्मिक व्देष निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिपब्लिक टिव्हीचे संपादक अर्णब गोस्वामी यांच्याविरोधात मुंबई पोलिसांनी कारणे दाखवा नोटीस बजावली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गोस्वामी यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (०२-१२-२०२०) :** (१) होय.
(२) होय.
(३) पोलीस स्टेशन ना.म. जोशी मार्ग यांनी रिपब्लिक टिव्हीचे संपादक यांच्या विरोधात कलम १०८ (१) (अ) फौ.प्र.सं. अन्वये न्यायालयीन सुरक्षा कार्यवाही प्रकरणी १/२०२०, चॅप्टर केस क्र. १/२०२० अन्वये प्रतिबंधात्मक कार्यवाही केली असून सदर प्रकरणी विशेष कार्यकारी दंडाधिकारी, वरळी विभाग, मुंबई यांच्या न्यायालयात सुनावणी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील पोलिसांसाठी घरे उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२४) ५३३९ (१२-११-२०२०). श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात पोलिसांसाठी सध्या ७५ हजार ३३५ घरे उपलब्ध असून त्यापैकी ४६ हजार घरे ब्रिटिशांनी बांधलेली आहेत तर शासनाने गेल्या ७३ वर्षात फक्त २९ हजार घरांची उभारणी केली आहे, पोलिसांसाठी गृहनिर्माणाचे ३० प्रकल्प सध्या मंजूर झाले असले तरी त्यातून फक्त ७,६७६ घरेच उपलब्ध होणार आहेत तर उर्वरित ९८ प्रकल्पातील १९,४२६ घरांच्या प्रस्तावांची विविध टप्प्यांवर कामे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्व पोलिसांकडे स्वत:च्या मालकीची घरे नसतात, बदली झालेल्या प्रत्येक ठिकाणी घर घेणेही शक्य नसते, पोलिसांची संख्या वाढत असताना घरांची संख्या मात्र वाढलेली नाही, मुंबईत बांधलेल्या १९ हजार घरांपैकी साडेचार हजार घरे १२० ते १८० चौरस फुटांची असून तिथे राहणे

पोलिसांच्या कुटुंबियांना शक्य होत नाही, महाराष्ट्र पोलीस दलाचे संख्याबळ दोन लाखाच्या आसपास असून त्यापैकी ७० टक्के पोलिसांसाठी घरे उपलब्ध असावीत अशी मागणी पोलिसांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या पोलिसांना वसाहतींमध्ये घर मिळत नाही त्यांना शासन घरभाडे भत्ता देते, मात्र मुंबई व ठाण्यासारख्या ठिकाणी घरभाडे भत्ता कमी पडत असल्याने दोन्ही शहरात गृहनिर्माणासाठी जागा आणि निधी उपलब्ध करुन देणे शासनाला शक्य होत नसल्याने पोलिसांची कोंडी अधिक वाढली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील पोलिसांसाठी घरे उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (०२-१२-२०२०) :** (१) I. सध्या राज्यामध्ये ७८,८५४ सेवा निवासस्थाने उपलब्ध आहेत. त्यापैकी ४६,३२८ स्वातंत्र्यपूर्व काळातील आहेत तर ३२,५२६ सेवा निवासस्थाने ही स्वातंत्र्यानंतर बांधण्यात आलेली आहेत.

II. सद्य:स्थितीला महाराष्ट्र पोलीस गृह निर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांच्यामार्फत संपूर्ण राज्यामध्ये ४६ प्रकल्प प्रगतीत आहेत. त्यामधुन पोलीस विभागास एकूण ७,३२५ सेवा निवासस्थाने उपलब्ध होणार आहेत.

III. महाराष्ट्र पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांचे एकूण ९२ प्रकल्प प्राधान्यक्रम ठरवून महामंडळामार्फत हाती घेण्यात येईल.

(२) I. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आस्थापनेवर काही ब्रिटीशकालीन सेवा निवासस्थाने ही १८० चौ.फूट पेक्षा कमी क्षेत्रफळाची आहेत. शासन निर्णय, गृह विभाग, दिनांक ०१/१२/२०१६ व्दारे सर्व नवीन सेवा निवासस्थानांचे नकाशे व क्षेत्रफळ निश्चित करण्यात आली आहेत. त्याप्रमाणे पोलीस शिपाई/नाईक यांस मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हयात ४५ चौ.मी. आणि बाकी राज्यात ५० चौ.मी. क्षेत्रफळ अनुज्ञेय करण्यात आले आहे.

II. एकूण मनुष्यबळाच्या ७० टक्के संख्या ही गरजपूर्ती स्तर (Satisfaction Level) समजून निधी उपलब्ध मर्यादेत निवासस्थाने बांधकाम हाती घेण्यात येईल.

(३) व (४) I. शासकीय भूखंडावर शासकीय निधीतून बांधकाम आणि पोलीस गृहनिर्माणकरीता स्थानिक नियोजन प्राधिकरणाने आरक्षित केलेल्या भूखंडांचे खाजगी विकासकामार्फत पोलीस सेवा निवासस्थाने बांधणे यामधून गरजेपूर्ती स्तर गाठण्याची नियोजन आहे.

II. सध्या महाराष्ट्र पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई मार्फत राज्यात ४६ प्रकल्प प्रगतीपथावर असून त्यामधून ७,३२५ सेवा निवासस्थाने पोलीस दलास उपलब्ध होणार आहेत.

III. राज्यातील पोलीस दलातील कर्मचारी यांना स्वत:चे घर बांधणीसाठी बँकामार्फत कर्ज व्यवस्था करण्याबाबत गृह विभागाच्या शासन निर्णय, दिनांक १०/०४/२०१७ अन्वये निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेंतर्गत अंदाजित रुपये ९५०/- कोटी कर्ज वितरित करण्यात आले आहे.

IV. पोलिसांकरीता मोठ्या प्रमाणात सेवानिवासस्थाने उपलब्ध व्हावीत या दृष्टीने सर्व उपलब्ध पर्याय तपासण्यात येत आहेत. जेणेकरुन येत्या काळात पोलीस दलाची सेवानिवासस्थानांची गरज मोठ्या प्रमाणात भागवता येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डॉ.नरेंद्र दाभोळकर व कॉ.गोविंद पानसरे यांच्या हत्येच्या तपासाबाबत

**(२५) ५३९४ (१२-११-२०२०). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम : तारांकित प्रश्न क्रमांक २५० ला दिनांक २७ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधश्रध्दा निर्मुलन समितीचे संस्थापक डॉ.नरेंद्र दाभोळकर आणि ज्येष्ठ विचारवंत कॉ.गोविंद पानसरे यांच्या हत्या होऊन अनुक्रमे सुमारे सात व पाच वर्षाचा कालावधी लोटल्यानंतरही त्याबाबतचा तपास पूर्ण झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतचा तपास योग्य दिशेने होत नसल्यामुळे त्याबाबत मा.उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त करुन शासनास यासंदर्भात वेळोवेळी काही आदेश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने कोणत्या मुद्यांवर नाराजी व्यक्त करुन कोणते आदेश दिले आहेत, या संदर्भातील तपासाची सद्य:स्थिती काय आहे व तपास किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (०३-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही, डॉ.दाभोळकर हत्या प्रकरणी डेक्कन पोलीस ठाणे येथे दाखल गु.र.क्र.१५४/२०१३ या गुन्ह्याचा तपास दिनांक ०२/०६/२०१४ रोजी सीबीआयकडे मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार वर्ग करण्यात आला आहे.

कॉ.गोविंद पानसरे यांच्या हत्या प्रकरणात अज्ञात आरोपींविरुध्द दाखल करण्यात आलेला गुन्हा एस.आय.टी.ने उघडकीस आणून कटात सहभागी १२ आरोपींपपैकी १० आरोपींना अटक करुन त्यांच्याविरुध्द न्यायालयात दोषारोपत्र सादर करण्यात आले आहेत. दोन फरारी आरोपींचा कसोशीने शोध घेण्यात येत आहे.

(२), (३) व (४) कॉ.पानसरे प्रकरणी गुन्ह्यात निष्पन्न दोन फरारी आरोपींचा शोध घेऊन त्यांना अटक करण्यास होत असलेल्या विलंबामुळे मा.उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त करुन सदर फरारी आरोपीच्या शोधाच्या अनुषंगाने काही मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत.

फरार दोन आरोपी हे न्यायालयीन प्रक्रियेतून फरारी घोषित करण्यात आले आहे. त्यांची माहिती देणाऱ्या नागरिकास शासनाकडून ५० लाख रुपयांचे बक्षिस जाहीर करण्यात आले आहे. राज्यासह अन्य राज्यातील पोलीस व

गुप्तचर यंत्रणांशी समन्वय साधून तसेच खास बातमीदार व तपास पथके नियुक्त करुन कसोशीने फरार आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. गुन्ह्यात वापरलेल्या पिस्टलचे भाग उल्हासनदीच्या पात्रालगतच्या खाडीत टाकल्याने त्याचा अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन शोध घेण्यात येत आहे. गुन्ह्यातील इतर दोन आरोपींनी मा.जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर येथे जामीन मंजुरीसाठी दाखल केलेले अर्ज मा.न्यायालयाने नामंजूर केले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नांदेड येथील क्रीडा कार्यालयास निधी व साहित्य उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२६) ५४११ (११-११-२०२०). श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहा (जि.नांदेड) तालुक्यात सन १९९७-९८ मध्ये तालुका क्रीडा अधिकारी कार्यालय मंजूर झाल्यानंतर निधी अंतर्गत उक्त कार्यालय उभे राहिले, परंतू मागील काही वर्षापासून सदरहू कार्यालय निधी, देखभाल व दुरुस्तीअभावी बंद असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड तालुक्यातील शाळांमधील राज्य व राष्ट्रीयस्तरावर विद्यार्थी गेले आहेत, परंतु नवीन गुणवंत खेळाडू निर्माण करण्याची जबाबदारी असलेले क्रीडा अधिकारी कार्यालयात उपस्थित राहत नसल्याने सदरहू कार्यालयावर शासनाचे नियंत्रण नसल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली असून या कार्यालयाला किती क्रीडा साहित्य, निधी उपलब्ध झाला याबाबत चौकशी करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नांदेड येथील होतकरु खेळाडू निर्माण व्हावे याकरीता या क्रीडा कार्यालयास आवश्यक निधी, साहित्य उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (०३-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डॉ.बाबासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठातील रोजंदारी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेणेबाबत

**(२७) ५४३३ (११-११-२०२०). श्री.रामदास कदम :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील डॉ.बाबासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठातील रोजंदारी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबत अनेकवेळा विनंती अर्ज व निवेदन देवूनही शासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी करण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली, कार्यवाहीचा थोडक्यात तपशील काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन डॉ.बाबासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठातील रोजंदारी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०२-१२-२०२०) :** (१) डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठातील रोजंदारी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबतची निवेदने शासनास प्राप्त झालेली आहेत.
(२) व (३) राज्यात हंगामी पदे निर्माण करू नयेत व ती भरण्यात येवु नयेत, हंगामी स्वरुपाची कामे ज्या विभागांमध्ये केली जातात ती यापुढे कंत्राटी पध्दतीने करून घेण्यात यावीत, असे वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक १०/०९/२००१ अन्वये निदेश आहेत.

डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली येथील रोजंदारी मजूरांना कायम आस्थापनेवर सामावून घेण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला होता. सदर रोजंदारी मजुरांना सामावून घेण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत सदरच्या नियुक्त्या नियमित केल्यास राज्यातील इतर विभागांतूनही अशा प्रकारच्या मागण्या येतील व शासनावर प्रचंड आर्थिक बोजा येईल, असे अभिप्राय देऊन सदरचा प्रस्ताव शासनाने अमान्य केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबईत मासेमारी पास/परवाना कार्यालय सुरु करण्याबाबत

**(२८) ५४४७ (११-११-२०२०). श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ, बदलापूर, कर्जत, भिवंडी, मुरबाड तसेच नवी मुंबईतील कोपरखैरणे, घणसोली, ऐरोली, वाशी व बेलापूर येथील मत्स्यव्यवसाय करणाऱ्या महिलांना फिशिंग पास व फॉर्म नंबर २ घेण्यासाठी पालघर येथे जावे लागत असून नवी मुंबई ते पालघर हे अंतर प्रवासाच्यादृष्टीने महिलांना खूपच गैरसोयीचे व त्रासदायक होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबईतच मध्यवर्ती ठिकाणी फिशिंग पासचे कार्यालय उपलब्ध करून द्यावे अशी मागणी तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी व कोळी बांधवांनी मत्स्यव्यवसाय विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नवी मुंबईत मासेमारी पास/परवाने मिळविण्याचे कार्यालय सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (२७-११-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) पालघर जिल्ह्याच्या निर्मितीनंतर मत्स्यव्यवसाय विभागाचे ठाणे जिल्हा व पालघर जिल्ह्यासाठी स्वतंत्र जिल्हा कार्यालय निर्माण करणे व सदर कार्यालयासाठी पदनिर्मिती करण्याच्या प्रस्तावावर शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

## सजा दादेगाव (ता.आष्टी, जि.बीड) येथील तलाठी व संबंधित अधिकाऱ्यांनी गैरव्यवहार केल्याबाबत

**(२९) ५४६७ (११-११-२०२०). श्री.सुरेश धस : दिनांक ८ सप्टेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ५ मधील प्रश्न क्रमांक ४२८२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सजा दादेगाव (ता.आष्टी, जि.बीड) येथे कार्यरत तलाठ्याने जनावरांच्या छावणी गैरव्यवहार, दुष्काळी अनुदान, पीक विमा, जमिनीचे फेरफार, सातबारा बदल करणे इ. गैरप्रकार केल्यामुळे उक्त तलाठ्यास सेवेतून निलंबित करण्यात आले होते, तसेच त्याचेवर अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल होऊनही तलाठ्यास अटकपूर्व जामिन मंजूर झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तलाठी सजावर सतत गैरहजर असल्याने लोकप्रतिनिधींनी विचारणा केली असता “मी उपविभागीय अधिकारी यांना रुपये एक लाख महिना देतो, मी कोणाला घाबरत नाही” असे उत्तर देऊन लोकप्रतिनिधींना दमदाटी केल्याचे प्रकार निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अतिशय गंभीर गुन्ह्यात निलंबन होऊनही सदर तलाठ्याची पुन्हा त्याच तालुक्यात त्याच सजावर नियुक्ती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर तलाठ्याची कोणत्या नियमाव्दारे नियुक्ती केली आहे याबाबत उपविभागीय अधिकारी, बीड यांचेकडे लेखी पत्राव्दारे विचारणा केली असता उपविभागीय अधिकारी, पाटोदा यांनी त्यांचे दिनांक २२/०७/२०२० च्या पत्रान्वये विधानपरिषद सदस्यांना वस्तुस्थिती अवगत केली आहे, वस्तुस्थितीची थोडक्यात माहिती काय आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित तलाठ्याची विभागीय चौकशीची कारवाई पूर्ण झाली आहे काय, तसेच संबंधित तलाठ्यास परस्पर पदभार सोपविल्याबाबत तहसिलदार, आष्टी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (०१-१२-२०२०) :** (१) होय.

(२) अशी बाब उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाटोदा यांचे कार्यालयास निदर्शनास आलेली नाही.

(३) संबंधित तलाठी यांना पुन:स्थापित करुन त्यांची तलाठी सजा लोणी (स), ता.आष्टी येथे पदस्थापना देण्यात आली होती. तहसिलदार आष्टी यांनी परस्पर संबंधित तलाठ्याकडे सजा दादेगांव, ता.आष्टी या सजाचा अतिरीक्त पदभार सोपविलेला आहे.

(४) सन्माननीय विधानपरिषद सदस्य यांना उपविभागीय अधिकारी, बीड यांनी दिनांक २२/०७/२०२० च्या पत्रान्वये अवगत केलेली थोडक्यात वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे :-

संबंधित तलाठी यांना पुन:स्थापित करुन त्यांना निलंबन झालेल्या सजावर नियुक्ती न देता सजा लोणी, ता.आष्टी येथे पदस्थापना देण्यात आली होती. तथापि, तहसिलदार आष्टी यांनी परस्पर त्यांचेकडे दादेगांव ता.आष्टी या सजाचा अतिरिक्त पदभार सोपविलेला आहे. त्यानंतर तहसिलदार आष्टी यांनी त्यांचे पत्र दिनांक २१/०४/२०२० नुसार संबंधित तलाठी यांना ता.आष्टी येथून कार्यमुक्त केले असता त्यांना पाटोदा तालुक्यातील तलाठी सजा भायाळा, ता.पाटोदा येथे पदस्थापना देण्यात आली. दरम्यानच्या कोविड-१९ महासाथीच्या प्रादुर्भावामुळे लॉकडाऊन कालावधीत उपविभागीय अधिकारी, पाटोदा हे कायदा व सुव्यवस्थेच्या कामकाजात व्यस्त होते. तसेच या कालावधीत कर्मचाऱ्यांची उपस्थिती सिमीत केली असल्याने सन्माननीय सदस्यांना पत्राचे उत्तर वेळेवर देता आले नाही. तसेच मा.लोकप्रतिनिधींकडून प्राप्त होणाऱ्या पत्रांची दखल घेण्यात येत आहे.

(५) व (६) संबंधित तलाठी यांना निलंबित केलेल्या प्रकरणामध्ये विभागीय चौकशीची कार्यवाही पूर्ण झालेली असून सदर अहवालाच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, पाटोदा यांचेस्तरावरुन सदरहू प्रकरण अंतिम करण्यात येत आहे.

तसेच संबंधित तलाठ्यास परस्पर पदभार सोपविल्याबद्दल तत्कालीन तहसिलदार, आष्टी यांना ‘कारणे दाखवा’ नोटीस काढून त्याबाबत खुलासा मागविण्यात आलेला आहे.

---

## दापोली (जि.रत्नागिरी) येथील पशुवैद्यकीय चिकित्सालयाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत

**(३०) ५४७६ (११-११-२०२०). श्री.रामदास कदम :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) येथील पशुवैद्यकीय चिकित्सालय हे बांधकाम अपूर्ण अवस्थेत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दापोली (जि.रत्नागिरी) येथील पशुवैद्यकीय चिकित्सालयाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (२७-११-२०२०) :** (१) व (२) दापोली (जि.रत्नागिरी) येथील पशुवैद्यकीय चिकित्सालयाच्या इमारत बांधकामास जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत मंजुरी देण्यात आली असून, कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाच्या आणीबाणीच्या काळात मजुर उपलब्ध होऊ न शकल्याने सदर काम करण्यास अडचणी येत होत्या. तथापि, आता काम प्रगतीत असून ते अंतिम टप्प्यात आहे. माहे डिसेंबर, २०२० पर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजन असून त्याप्रमाणे संबंधित ठेकेदारास सूचना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिहोरा (ता.तुमसर, जि.भंडारा) परिसरातील टेकड्या भूमाफियांकडून बेकायदेशीररित्या फोडण्यात येत असल्याबाबत

**(३१) ५४८२ (११-११-२०२०). डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिहोरा (ता.तुमसर, जि.भंडारा) परिसरातील सातपुडा पर्वत रांगांच्या टेकड्या भूमाफियांकडून राजरोसपणे फोडण्यात येवून अनधिकृत खोदकाम करण्यात येत असल्याचे दिनांक १७ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी अनधिकृत खोदकाम बंद करण्याबाबत शासनाकडे लेखी पत्राव्दारे मागणी/निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनधिकृत बांधकाम करणाऱ्या भूमाफियांना सहकार्य करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर तसेच भूमाफियांवर कारवाई करुन अनधिकृत खोदकाम रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२७-११-२०२०) :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात वृध्दांवरील अत्याचार रोखण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(३२) ५४९३ (१२-११-२०२०). डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वृध्द सर्वाधिक असुरक्षित असल्याचे नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या (एनसीआरबी) अहवालातून निदर्शनास आले असून गेल्या वर्षीच्या आकडेवाडीनुसार राज्यात वृध्दांवरील अत्याचाराचे ६ हजार १६३ गुन्हे नोंद झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात वृध्दावरील अत्याचार रोखण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (०२-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
२०१९ एनसीआरबी यांनी प्रसिध्द केलेली आकडेवारीची महाराष्ट्र राज्यात वृध्दावरील (ज्येष्ठ नागरिक) अत्याचाराचे ६ हजार १६३ गुन्हे नोंद झाले आहेत.

(२) वृध्दांचा (ज्येष्ठ नागरिक) छळ व पिळवणूक यापासून संरक्षण करण्याबाबत संबंधित पोलीस घटक प्रमुखांना वरिष्ठांकडून सूचना दिलेल्या आहेत.

वृध्दांसाठी (ज्येष्ठ नागरिक) विशेष हेल्पलाईन सुरु करण्यात आली असून नागरिकांना विविध माध्यमांतून कळविण्यात आले आहे.

आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत मिळण्यासाठी मोबाईल क्रमांकावरुन संपर्क प्रस्थापित करण्यात आले आहेत व आधुनिक यंत्रणाव्दारे सूचना देण्यात आल्या आहेत.

नियंत्रण कक्षातील क्रमांक १०० वरील तक्रारींचे निवारण करण्यात येत आहे.

एकटे रहाणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांची यादी तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

पोलीस अधिकारी/अंमलदार वेळोवेळी ज्येष्ठ नागरिकांना भेटी देऊन त्यांच्या अडचणी सोडवित असतात.

वरीष्ठ पोलीस अधिकारी पोलीस ठाणे भेटीत ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेसंदर्भात आढावा घेऊन योग्य त्या सूचना देत असतात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## फॉरेन्सिक सायन्स पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३३) ५५०८ (१२-११-२०२०). डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, औरंगाबाद व नागपूर येथे स्थापन करण्यात आलेल्या शासकीय न्यायसहायक विज्ञान संस्थांमधून आतापर्यंत पदवी (बी.एस्सी फॉरेन्सिक सायन्स) चे एकूण ८८८ आणि पदव्युत्तर पदवी (एम.एस्सी. फॉरेन्सिक सायन्स) चे एकूण ३०३ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयातील विविध संवर्गातील सुधारीत सेवाप्रवेश नियमाच्या प्रस्तावामध्ये न्यायसहायक विज्ञान या विषयातील पदवीचा समावेश करण्यात आलेला आहे. तसेच, विभागामार्फत न्यायसहायक वैज्ञानिक संस्थेच्या पदव्या संचालनालयातील विविध संवर्गातील पदासाठी आणि हस्ताक्षर व छायाचित्रण विभागातील सहायक शासकीय हस्तऐवज परिक्षक या पदाकरीताच्या शैक्षणिक अर्हतेस समकक्ष म्हणून ग्राह्य धरण्यात आलेल्या आहेत, तसेच या व्यतिरिक्त बैठकीतील इतर मुद्यांबाबत न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय व न्यायसहायक विज्ञान संस्था यांचे समन्वयाने सुरु असलेली पुढील आवश्यक ती कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, फॉरेन्सिक सायन्समध्ये पदवी व पदव्युत्तर शिक्षणानंतर विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणांशी संबंधित क्षेत्रात रोजगार उपलब्ध करुन देण्यासंबंधी संचालनालयातील वर्ग-१ व वर्ग-२ ची रिक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत तसेच उर्वरित रिक्त पदे भरणेबाबत सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने फॉरेन्सिक सायन्स पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (०२-१२-२०२०) :** (१) मुंबई, औरंगाबाद व नागपूर येथे स्थापन करण्यात आलेल्या शासकीय न्यायसहायक विज्ञान संस्थांमधून आतापर्यंत पदवी (बी.एस्सी फॉरेन्सिक सायन्स) चे एकूण ९९४ आणि पदव्युत्तर पदवी (एम.एस्सी फॉरेन्सिक सायन्स) चे एकूण ३६२ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत.

(२) न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय व न्यायसहायक विज्ञान संस्था यांचे समन्वयाने शासनस्तरावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) व (४) न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाच्या आस्थापनेवरील गट-अ ते गट-ड या संवर्गातील सरळसेवा कोटयातील ३३७ रिक्त पदे भरणेबाबत पद भरतीचे निर्बंध शिथिल करणेबाबतचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागास मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. तसेच, संचालनालयातील वर्ग-१ ची एकूण-५ पदे, वर्ग-२ ची एकूण-४३ पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून सरळसेवेने भरण्यासाठी आयोगामार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बीड पंचायत समिती (ता.जि.बीड) मध्ये मनरेगा योजनेच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३४) ५५२६ (११-११-२०२०). श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड पंचायत समिती (ता.जि.बीड) मध्ये मनरेगा योजनेत रुपये १६ ते १७ कोटींची बोगस कामे ऑनलाईन केल्याचे दाखवून गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गैरव्यवहार प्रकरणी दोषी असलेल्या मुख्य आरोपींवर कारवाई न करता केवळ कंत्राटी कर्मचारी यांचेवर कारवाई करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गैरव्यवहारात मुख्य आरोपींना अभय दिले जात असून यामध्ये स्थानिक लोकप्रतिनिधीच्या स्वीय सहायकाचाही समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बीड पंचायत समितीच्या मनरेगा योजनेत गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (२६-११-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे, १४.८० कोटीची देयके ऑनलाईन करण्यात आली होती. यात गैरव्यवहार झालेला नसून अनियमितता झालेली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे ही खरे नाही.

(४) व (५) होय, सदर प्रकरणी चौकशी करूनच पोलीस गुन्हा नोंद करण्यात आलेला असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

---

## राज्यात विशेषत: औरंगाबाद येथे खतांची साठेबाजी करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(३५) ५५९४ (११-११-२०२०). श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.संजय दौंड, डॉ.सुधीर तांबे, श्री.अरुणकाका जगताप, श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: औरंगाबाद येथील बी-बियाणे खतांचे व्यापारी खतांची साठेबाजी करुन शेतकऱ्यांना चढ्या दराने खतांची विक्री करीत असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी माहे मे, २०२० पासून अनेकदा शासनाकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.कृषी मंत्री महोदयांनी औरंगाबाद येथे शासकीय आढावा बैठकीच्या निमित्ताने दौरा असताना सदर तक्रारींच्या अनुषंगाने दिनांक २१ जून, २०२० रोजी औरंगाबाद मधील जाधववाडीतील नवीन कुमार पाटणी यांच्या नवभारत फर्टिलायझर्स केंद्राची मा.कृषी मंत्री यांनी शेतकऱ्यांचा वेश परिधान करुन तेथे स्टींग ऑपरेशन केले, या स्टींग ऑपरेशनमध्ये शेतकरी वेषातील मा.कृषी मंत्री महोदयांनी खताची मागणी केली असताना व केंद्रात खतसाठा शिल्लक असतानाही खतसाठाच शिल्लक नसल्याचे मा.कृषी मंत्री महोदयांना केंद्र मालकांकडून सांगण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, युरीया खताची किंमत रुपये २६७/- प्रति गोणी असताना विक्रेत्यांकडून रुपये ३५० ते ४०० एवढा वाढीव दर आकारला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित व्यापारी/विक्रेत्याविरुध्द तसेच अन्य व्यापाऱ्यांशी संगनमत असणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच अशाप्रकारे खतांची साठेबाजी करणाऱ्या राज्यातील व्यापाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२७-११-२०२०) :** (१) लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) याप्रकरणी मा.मंत्री (कृषी) यांनी संबंधित गुणनियंत्रण निरीक्षकास सक्तीच्या रजेवर पाठविण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार संबंधित गुणनियंत्रण निरीक्षक यांना दिनांक २२ जून, २०२० पासून रजेवर पाठविण्यात आले होते.

मे.नवभारत फर्टीलायझर्स या खत विक्रेत्याकडे खताची मागणी केली असता, चढया दराने खतांची किंमत सांगितली नसली तरी, खते उपलब्ध असून देखील मागणीच्या प्रमाणात खते उपलब्ध करुन दिलेली नाहीत. त्यामुळे सदर खत विक्रेत्याचे घाऊक व किरकोळ दोन्ही परवाने निलंबित करण्यात आलेले आहेत.

औरंगाबाद जिल्हयात खत विक्रेत्यांच्या दुकानांच्या तपासणी दरम्यान जादा दराने युरीया हे खत विक्री करताना दोषी आढळून आलेल्या २० खत विक्रेत्यांचे परवाने जून अखेर निलंबित करण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे खत नियंत्रण आदेश १९८५ मधील इतर तरतूदी अन्वये अनियमितता करताना आढळून आलेल्या इतर ४३ खत विक्रेत्यांविरुध्द कारवाई करुन एकूण ६३ खत विक्रेत्यांचे परवाने, निलंबित करण्यात आलेले आहेत.

राज्यामध्ये खत (नियंत्रण) आदेश १९८५ मधील तरतूदींचे उल्लंघन केल्यामुळे एकूण ५८१ परवाने निलंबित व ९१ परवाने रद्द केले आहेत. २९ विक्रेत्यांविरुध्द पोलिसात गुन्हे दाखल केलेले आहेत. एकूण ६१५ ठिकाणी विक्री बंद आदेश बजावण्यात आलेले आहेत. तसेच, २८ प्रकरणांत ४८४.८० मे.टन साठा जप्त केला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात क्रीडा प्रबोधिनी स्थापन करण्याबाबत

**(३६) ५५९९ (११-११-२०२०). श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, डॉ.सुधीर तांबे, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) क्रीडा क्षेत्रातील दर्जा उंचाविण्यासाठी राज्यातील वेगवेगळ्या १४ ठिकाणी क्रीडा प्रबोधिनी स्थापन करण्याचा निर्णय शासनाने यापूर्वी घेतला असून या १४ ठिकाणापैकी केवळ ११ ठिकाणी क्रीडा प्रबोधिनी अस्तित्वात येऊन त्यामधील अहमदनगर व सांगली येथील क्रीडा प्रबोधिनी बंद करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बंद पडलेल्या क्रीडा प्रबोधिनीसह अन्य सर्व क्रीडा प्रबोधिनीवर लाखो रुपये खर्च होऊनही प्रशासकीय उदासिनता व नियोजनाचा अभाव यामुळे यासर्व क्रीडा प्रबोधिनी बंद पडण्याच्या स्थितीत असल्याचे दिनांक ९ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात १४ क्रीडा प्रबोधिनी स्थापन करावयाच्या असताना उर्वरित तीन क्रीडा प्रबोधिनी स्थापन न करण्याची कारणे काय व त्या कोणकोणत्या जिल्ह्यात स्थापन करावयाच्या होत्या, त्याचप्रमाणे गडचिरोली येथील क्रीडा प्रबोधिनी बल्लाळपूर येथे स्थलांतरीत करण्याची कारणे काय व स्थलांतरणास शासनाची मान्यता घेतली होती काय व केव्हा,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सांगली व अहमदनगर (प्रवरानगर) सह राज्यातील बंद पडलेल्या सर्व क्रीडा प्रबोधिनी स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (०२-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) शासन निर्णय, दिनांक १८ नोव्हेंबर, १९९५ मध्ये नमूद १४ ठिकाणांपैकी ११ ठिकाणी क्रीडा प्रबोधिनी सुरु आहेत, रत्नागिरी, नवी मुंबई व ठाणे या ठिकाणी जागेअभावी सुरु झाल्या नाहीत.

दुसऱ्या टप्प्यात गडचिरोली येथे १९९७-९८ मध्ये क्रीडा प्रबोधिनी सुरु करण्यात आली. अल्प खेळाडू संख्या व अपुऱ्या सुविधांमुळे सदर क्रीडा प्रबोधिनी बल्लारपूर, जि.चंद्रपूर येथे सुरु करण्याचे आदेश दिले असले तरी प्रत्यक्षात अद्याप स्थलांतर झालेले नाही.

(४) यासंदर्भात तपासणी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मराठवाड्यातील तलाठी पदाची निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपत्र देण्याबाबत

**(३७) ५६५२ (११-११-२०२०). श्री.विनायकराव मेटे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना विषाणू संसर्गापूर्वी एकाचवेळी तलाठी पदाची भरती प्रक्रिया झाली असून पुणे जिल्ह्यातील तलाठी पदी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना दिनांक ४ ऑगस्ट, २०२० रोजी नियुक्तीपत्रे दिली गेली, मात्र मराठवाड्यातील बीड, औरंगाबाद व नांदेड या तीन जिल्ह्यातील निवड झालेल्या उमेदवारांना अद्याप नियुक्तीपत्र दिले गेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोनाचा अडसर सांगून मराठवाड्यातील बीड, औरंगाबाद व नांदेड या तीन जिल्ह्यातील निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपत्र देण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, परभणी जिल्ह्यासह मराठवाड्यात नविन तलाठी सजाची निर्मिती करण्याबाबतचा निर्णय शासनाने यापूर्वीच घेतला असून नविन तलाठी सजे निर्मिती व तलाठी पद निर्मितीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतचा थोडक्यात जिल्हानिहाय तपशील काय आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मराठवाड्यातील बीड, औरंगाबाद, परभणी व नांदेड जिल्ह्यातील निवड झालेल्या तलाठ्यांना नियुक्ती पत्र देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (०२-१२-२०२०) :** (१) होय.
(२) नाही.
(३) औरंगाबाद महसूल विभागांतर्गत ६८५ नवीन तलाठी साझे निर्माण करण्यात आले आहेत. त्या अंतर्गत औरंगाबाद-११७, जालना-८०, परभणी-७६, हिंगोली-६१, बीड-१३८, नांदेड-८४, लातूर-३९, उस्मानाबाद-९० याप्रमाणे जिल्हानिहाय नवीन तलाठी साजे निर्मितीस मान्यता देण्यात आली असून त्याकरीता तलाठी पदनिर्मितीची कार्यवाही चालू आहे.
(४) व (५) मा.सर्वोच्च न्यायालयाचे दिनांक ०९/०९/२०२० रोजीचे एस.ई.बी.सी. आरक्षणास दिलेले अंतरिम स्थगिती आदेश विचारात घेता, मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.६५०३/२०२० मध्ये दिनांक ०६/११/२०२० रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने सन २०१९ तलाठी पद भरतीतील एस.ई.बी.सी. संवर्गातील पदे वगळता इतर प्रवर्गातील निवड झालेल्या उमेदवारांच्या नियुक्तीबाबत तत्काळ कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, बीड व विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना दिनांक २७/११/२०२० च्या शासन पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे दिनांक ०२/१२/२०२० च्या शासन पत्रान्वये औरंगाबाद आणि नांदेड जिल्ह्यातील उमेदवारांच्या नियुक्तीबाबतही तत्काळ कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

परभणी जिल्ह्यातील तलाठी पद भरतीतील निवड झालेल्या उमेदवारांना दिनांक २७/१२/२०१९ अन्वये नियुक्तीपत्रे देण्यात आलेली आहेत.

---

## राज्यात आत्महत्याचे प्रमाण रोखण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(३८) ५७४१ (१२-११-२०२०). श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आत्महत्यांच्या महाराष्ट्र राज्य गेल्या वर्षी (२०१९) पहिल्या क्रमांकावर राहिले असून सलग तीन वर्षे हे प्रमाण कमी होत नसल्याचे राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभाग (एनसीआरबी) ने प्रसिध्द केलेल्या अहवालात माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत आत्महत्येचे प्रमाण ४.७ टक्क्यांनी वाढले असून सन २०१८ च्या तुलनेत राज्यात आत्महत्यांचे प्रमाण ५.३ ने वाढून १५.४ टक्के झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील आत्महत्येचे प्रमाण रोखण्याबाबत उपाययोजना करणे, विविध उपक्रम राबविणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील आत्महत्येचे प्रमाण रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (०३-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सन २०१८ च्या तुलनेत मुंबईत आत्महत्येचे प्रमाण ४.७ टक्क्यांनी व महाराष्ट्राचे ५.३ टक्क्यांनी वाढलेले असल्याचे खरे आहे.

| अ. क्र. | घटक | सन | | वाढ/घट टक्केवारमध्ये |
|---|---|---|---|---|
| | | २०१८ | २०१९ | |
| १ | महाराष्ट्र | १७९७२ | १८९१६ | ५.३ वाढ |
| २ | मुंबई शहर | ११७४ | १२२९ | ४.७ वाढ |

सन २०१८ ते २०१९ पर्यंतची एनसीआरबी यांनी प्रसिध्द केलेली आत्महत्या प्रकरणाची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे :-

| अ. क्र. | घटक | सन | |
|---|---|---|---|
| | | २०१८ | २०१९ |
| १ | भारत | १३४५१६ | १३९१२३ |
| २ | महाराष्ट्र | १७९७२ | १८९१६ |

महाराष्ट्र राज्याची भारत देशाशी आत्महत्येबाबत तुलना करता आत्महत्येचे प्रमाण १३.६ टक्के आहे.
(३) राज्यातील आत्महत्येचे प्रमाण रोखण्याबाबत उपाययोजना करणे, विविध उपक्रम राबविणे या विषयीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींचे मागणीबाबत कोणतेही निवेदन आढळून आले नाही.
(४) राज्यात विविध कारणांमुळे आत्महत्या होतात. आत्महत्या रोखण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येतात तसेच शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी शासनामार्फत वेळोवेळी विविध उपाययोजना करण्यात येतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर कृषी विभागामधील कृषी सहायकांच्या बदल्यांमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(३९) ५७५४ (११-११-२०२०). श्री.रमेश कराड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर कृषी विभागांमध्ये वर्ग-३ कर्मचाऱ्यांच्या बदल्या करताना बदली आदेश हे विनंती बदली विकल्प न पाहता, सेवाजेष्ठता समुपदेशन न पाहता काढल्याने सदर बदल्यांमध्ये गैरव्यवहार आणि अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर कृषी विभागातील लातूर, उस्मानाबाद, हिंगोली, परभणी व नांदेड या पाच जिल्ह्यातील तीनशे पेक्षा अधिक बदलीपात्र कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता यादी, रिक्त जागी प्रसिध्दी न देता, समुपदेशन न घेता बदल्या करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कृषी सहायक बदल्यांमध्ये गैरव्यवहार आणि अनियमितता झाल्याप्रकरणी दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२७-११-२०२०) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) होय, सदर अनियमिततेसंदर्भात कृषी उपसंचालक तथा प्रभारी प्रशासन अधिकारी, विभागीय कृषी सहसंचालक कार्यालय, लातूर यांना निलंबित करण्यात आले असून त्यांच्याविरुध्द तसेच इतर संबंधित जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत

**(४०) ५७६६ (११-११-२०२०). श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अपघातग्रस्त शेतकऱ्यांसाठी रुपये दोन लाखांचे विमा संरक्षण देणाऱ्या गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेंतर्गत लॉकडाऊनच्या कालावधीतील १९३९ प्रस्ताव शासकीय पातळीवर प्रलंबित असून मा.कृषी मंत्री यांनी जिल्हा पातळीवर आढावा घेऊन सूचना दिल्या असतानाही १७५१ प्रस्तावांपैकी फक्त १५९ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद जिल्ह्यात गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत गत ३ वर्षात दाखल ४०९ प्रकरणांपैकी १९३ दावे कृषी सेवक व स्थानिक पोलीस प्रशासन यांच्यामध्ये समन्वय नसल्यामुळे प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा मृत्यू व अपघात होऊनही गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघाप विमा योजनेंतर्गत मदत देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेची कार्यवाही जलद होणेकरीता लातूर, बीड, औरंगाबाद, उस्मानाबाद, परभणी व मराठवाडा विभागातील लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांनी तक्रार/निवेदन दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेतून आर्थिक मदत देण्याच्या कामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या बेजबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करून सदर योजनेची जलद अंमलबजावणी करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२७-११-२०२०) :** (१) अंशतः खरे आहे.

सन २०१९-२०२० या वर्षामध्ये गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना दिनांक १०/१२/२०१९ पासून दि युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कंपनी लि. पुणे या विमा कंपनी व जायका इन्शुरन्स ब्रोकरेज प्रा.लि. नागपूर या सल्लागार कंपनीमार्फत राबविण्यात येत आहे. दिनांक २०/११/२०२० रोजी सन २०१९-२०२० मध्ये एकूण २३३१ विमा प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यापैकी ५४३ विमा प्रस्ताव मंजूर केले असून ५८ विमा प्रस्ताव नामंजूर केले आहेत आणि १०७७ प्रस्ताव कागदपत्रांच्या अभावी प्रलंबित असून ६५३ प्रस्ताव विमा कंपनीकडे कार्यवाहीत आहे.

(२) हे खरे नाही.

दिनांक २०/११/२०२० अखेर पर्यंत औरंगाबाद जिल्हयातील सन २०१७-२०१८, २०१८-२०१९, २०१९-२०२० मध्ये एकूण ३६७ विमा प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यापैकी १५६ विमा प्रस्ताव मंजूर केले असून ८३ विमा प्रस्ताव नामंजूर केले आहे आणि ९१ प्रस्ताव कागदपत्रांच्या अभावी प्रलंबित असून ३७ प्रस्ताव विमा कंपनीकडे कार्यवाहीत आहे. याबाबतची वर्षनिहाय सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे :-

| वर्ष | प्राप्त विमा प्रस्ताव | मंजूर विमा प्रस्ताव | नामंजूर विमा प्रस्ताव | कंपनीकडे कार्यवाहीत | कागदपत्रा अभावी प्रलंबित |
|---|---|---|---|---|---|
| २०१७-२०१८ | १६० | १०७ | ५२ | ०१ | ०० |
| २०१८-२०१९ | १७५ | ४७ | ३१ | ३२ | ६५ |
| २०१९-२०२० | ३२ | २ | ०० | ०४ | २६ |
| एकूण | ३६७ | १५६ | ८३ | ३७ | ९१ |

(३) हे खरे नाही.

दिनांक २०/११/२०२० अखेर पर्यंत परभणी जिल्हयातील सन २०१७-२०१८, २०१८-२०१९, २०१९-२०२० मध्ये एकूण १८८ विमा प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यापैकी ९६ विमा प्रस्ताव मंजूर केले असून ३४ विमा प्रस्ताव नामंजूर केले आहे आणि २५ प्रस्ताव कागदपत्रांच्या अभावी प्रलंबित असून ३३ प्रस्ताव विमा कंपनीकडे कार्यवाहीत आहे. याबाबतची वर्षनिहाय सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे :-

| वर्ष | प्राप्त विमा प्रस्ताव | मंजूर विमा प्रस्ताव | नामंजूर विमा प्रस्ताव | कंपनीकडे कार्यवाहीत | कागदपत्रा अभावी प्रलंबित |
|---|---|---|---|---|---|
| २०१७-२०१८ | ७९ | ४५ | २८ | ०६ | ०० |
| २०१८-२०१९ | ७६ | ४३ | ०५ | १६ | १२ |
| २०१९-२०२० | ३३ | ०८ | ०१ | ११ | १३ |
| एकूण | १८८ | ९६ | ३४ | ३३ | २५ |

(४) लोकप्रतिनिधी/शेतकऱ्यांनी तक्रार/निवेदन प्राप्त झाल्याचे अभिलेखावरून दिसून येत नाही. तथापि, विभागीय कृषी सहसंचालकांच्या व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्यास्तरावर विशेष कॅम्पव्दारे मोहिम राबवून कागदपत्रांच्या पुर्ततेसाठी प्रयत्न करण्यात आलेले आहेत.

कृषी आयुक्तालयस्तरावर अधिकारी नियमितपणे विमा कंपनीच्या कार्यालयास भेट देऊन प्रगतीचा आढावा घेत आहेत. तसेच विमा कंपनी व विमा सल्लागार कंपनीच्या नियमित आढावा बैठका घेण्यात येत आहेत.

विमा प्रस्तावातील अनावश्यक त्रुटींबाबत वेळोवेळी निदर्शनास आलेल्या प्रकरणांवर विमा कंपनीस योग्य त्या सूचना त्या-त्यावेळी देण्यात आलेल्या आहेत. तसेच योजनेच्या सनियंत्रणासाठी तालुकास्तरावर तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समित्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बंजारा समाजाच्या तांड्यांना महसूली दर्जा देण्याबाबत

**(४१) ५७७७ (११-११-२०२०). श्री.राजेश राठोड, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बंजारा समाजाच्या तांड्यांना महसूली गावांचा दर्जा नसल्यामुळे या तांड्यांना रस्ते, पाणीपुरवठा, वीज इत्यादी मुलभूत सुविधांपासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बंजारा समाजाच्या तांड्यांना (बंजारा वस्ती) महसूली दर्जा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२७-११-२०२०) :** (१) व (२) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४ पोट-कलम (१) खंड (सहा) मध्ये ३०० किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या वाड्या/तांडे/वस्त्या यांना स्वतंत्र महसूली गावांचा दर्जा देण्याबाबत तरतूद आहे. त्याबाबतचे शासनाचे अधिकार शासन अधिसूचना क्र.टिएलसी/१०७६/६३९२३/म-६, दिनांक १/०७/१९७६ अन्वये जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार बंजारा समाजाच्या तांड्यांना महसुली गावाचा दर्जा देणेसंदर्भात नियमोचित कार्यवाही करणेबाबत शासनस्तरावरून जिल्हाधिकारी यांना वेळोवेळी निर्देश देण्यात आले आहेत.

राज्यातील बहुतांश ठिकाणी बंजारा समाजाच्या पात्र तांड्यांना महसुली गावाचा दर्जा देण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. औरंगाबाद विभागात परभणी जिल्ह्यातील जिंतूर, सेलू व पाथरी येथील ९ तांड्यांना महसुली गावांचा दर्जा देण्याबाबत कार्यवाही जिल्हाधिकारी स्तरावर सुरू असून नागपूर विभागातील नागपूर व वर्धा जिल्ह्यातील काही तांड्यांना महसुली दर्जा देण्याबाबत तपासण्यात येत आहे.

बंजारा तांडे महसुली गावात रूपांतरीत झाल्यावर संबंधित ग्रामपंचायतीमार्फत सदर तांड्यांना रस्ते, पाणीपुरवठा, वीज इत्यादी मुलभूत सुविधा पुरविण्यात येतात. जोपर्यंत विहित प्रक्रिया पूर्ण करुन पात्र तांड्यांचे महसुली गावात रुपांतर होत नाही तोपर्यंत संबंधित तांड्यांना तसेच कमी लोकसंख्या असलेल्या तांड्यांना मूळ महसुली गावांतर्गत विविध शासकीय योजनांमधून मुलभूत सुविधा पुरविण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पिकांना विमा कवच देण्याबाबत

**(४२) ५८५६ (११-११-२०२०). श्री.संजय दौंड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात पावसामुळे पिकांची प्रतवारी किंवा गुणवत्ता बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांना विमा कवच देण्याची मागणी स्थानिक

लोकप्रतिनिधींनी शासनाकडे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बीड जिल्ह्यातील बाधित पिकांना विमा कवच देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२६-११-२०२०) :** (१) हे खरे नाही.

अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे अभिलेखात दिसून आले नाही. तथापि, बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पिकांना खरीप २०२० मध्ये विमा कवच देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे.

(२) व (३) खरीप २०२० मध्ये बीड जिल्ह्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना भारतीय कृषी विमा कंपनीमार्फत राबविण्यात आली. बीड जिल्ह्यातील १७.९० लाख शेतकऱ्यांनी रक्कम रुपये ६०.६१ कोटी विमा हप्ता भरुन ६.२३ लाख हे. क्षेत्र विमा संरक्षित केले आहे. योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीड जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागात अनुसूचित जाती, जमातीच्या विशेष घटक योजनेमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४३) ५८६० (११-११-२०२०). श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाकडून अनुसूचित जाती, जमाती उपयोजनेंतर्गत विशेष घटक योजना २०१९-२०२० मध्ये अर्थसंकल्पीय निधीतून २ दुधाळ जनावरांचे गट व १० + १ शेळी वाटप मधील पात्र ठरवलेले लाभार्थी हे चुकीच्या पध्दतीने निवडणे व अपात्र असल्याचे निष्पन्न झाले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आर्थिक व्यवहार करुन अपात्र लाभार्थी व चुकीच्या पध्दतीने निवड केलेल्या संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (२७-११-२०२०) :** (१) जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत अनुसूचित जाती व जमातीच्या लाभार्थ्यांना ०२ दुधाळ जनावरांचे गट व १० शेळया + ०१ बोकड शेळी गट वाटप या दोन योजना राबविण्याच्या अनुषंगाने शासन निर्णयात नमूद गठीत समितीमार्फत लाभार्थ्यांची निवड दिनांक १६/१२/२०१९ रोजी संगणकीय प्रणालीव्दारे (Randamization) करण्यात आली होती. सदर निवड प्रक्रियेच्या अनुषंगाने तक्रार प्राप्त झालेली असल्यामुळे सदरची निवड प्रक्रिया रद्द करुन योजनेस व्यापक प्रसिध्दी देऊन निवड प्रक्रियेचे पूर्ण चित्रीकरण करुन चिठ्ठी पध्दतीने नव्याने लाभार्थी निवड करावी असे निर्देश जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक ३०/०९/२०२० च्या पत्रान्वये दिलेले होते.

जिल्हाधिकारी, बीड यांच्या निर्देशानुसार दिनांक १५/१०/२०२० व दिनांक १६/१०/२०२० रोजी नव्याने लाभार्थी निवड करण्यात आली आहे. योजनेंतर्गत लाभार्थींची निवड प्रक्रिया दोन वेळा राबविल्यामुळे पूर्वी पात्र ठरलेले काही लाभार्थी नव्याने निवड केलेल्या यादीत पात्र ठरले नाहीत.

(२) व (३) सदर प्रकरणी आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांना चौकशी करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

---

## महात्मा फुले राहुरी कृषी विद्यापीठात कनिष्ठ संशोधन सहाय्यकांच्या बदल्यांना स्थगिती दिल्याबाबत

**(४४) ५८७७ (२०-११-२०२०). श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महात्मा फुले राहुरी कृषी विद्यापीठात कनिष्ठ संशोधन सहाय्यकांच्या बदल्यांना स्थगिती देणाऱ्या कुलगुरुंनी दुसरीकडे कृषी सहाय्यकांच्या बदल्याचे आदेश काढले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बदल्या विनंती स्वरुपाच्या असून अनेक कर्मचाऱ्यांच्या विनंती बदल्यांना मान्यता न देता विशिष्ट बदल्यांना मान्यता दिल्याप्रकरणाची चौकशी होऊन दोषींवर कारवाई करण्याची मागणी सदर कर्मचाऱ्यांनी निवारण समितीकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कृषी सहाय्यकांच्या बदलींचे दोन ठिकाणी वेगवेगळे आदेश काढल्यामुळे बदल्यांमध्ये अनियमितता झाल्याचे मत माजी कुलगुरुंनी व्यक्त केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२७-११-२०२०) :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनिमय आणि शासकीय कर्तव्य पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील कलम ५ (१) (ख) (ग) अन्वये ऑगस्ट, २०२० मध्ये नियतकालीन बदल्या येत असल्याने सन २०२० पावसाळी हंगामातील शिक्षण, संशोधन व विस्तार विषयक कामकाज सुरु झाले असल्याने कनिष्ठ संशोधन सहाय्यकांच्या नियतकालीक बदल्या न करता त्यांना आहे त्याच पदावर दिनांक ३१/०५/२०२१ पर्यंत ०१ वर्षाकरीता मुदतवाढ दिलेली आहे.

शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०१४/मुस-३४/प.क्र.३७९/१२, दिनांक ११ फेब्रुवारी, २०१५ मधील स्थायी आदेशानुसार कृषी सहाय्यक (गट क) संवर्गातील एकूण ३० कर्मचाऱ्यांच्या मध्यावधी बदल्या विनंतीनुसार व प्राध्यान्यक्रमानुसार माहे सप्टेंबर व ऑक्टोबर, २०२० मध्ये करण्यात आलेल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर कृषी संशोधन केंद्रातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(४५) ५९०५ (११-११-२०२०). श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील पालघर कृषी संशोधन केंद्रामध्ये गत ६ वर्षापासून महत्वाची असलेली भात पैदासकार, वनस्पती शास्त्रज्ञ तसेच चारसूत्री पीक शास्त्रज्ञांची पदे रिक्त असल्याने जिल्ह्यातील मुख्य पीक असलेल्या भातावरील संशोधन संपूर्णत: बंद झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यात भात, चिकू, नारळ व भाजीपाल्याचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले जात असल्याने शेतीला अधिक फायदेशीर ठरावे यासाठी जिल्ह्यात कृषी महाविद्यालय उभारावे, अशी मागणी स्थानिकांनी मागील अनेक वर्षापासून सातत्याने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यातील मुख्य पीक भात असून शेती तोट्यात गेल्यामुळे अशा कठीण परिस्थितीतही शेतकरी कर्ज घेवून विविध कंपन्यांकडून बियाणे खरेदी करतात, मात्र हे बियाणे शेतात लावल्यानंतर पिकातील भेसळ, निकृष्ट उगवण, कीड आणि रोग प्रादुर्भाव होऊन पिकाचे नुकसान होते, त्यावेळी हे शेतकरी कृषी विभागाकडे तक्रार करतात पण या रोगावर संशोधन करण्यासाठी शास्त्रज्ञच उपलब्ध नाहीत, परिणामत: कृषी शास्त्रज्ञाअभावी शेतकऱ्यांच्या तक्रारीचे योग्य ते निवारण होत नाही, त्यामुळे शेतकऱ्यांना दरवर्षी आर्थिक संकटाला सामोरे जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पालघर जिल्ह्यातील पालघर कृषी संशोधन केंद्रामधील भात पैदासकार, वनस्पती, चारसूत्री पीक तज्ञांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०२-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही. सद्य:स्थितीत राष्ट्रीय कृषी संशोधन प्रकल्प, पालघर (टप्पा-१) या योजनेमधील शास्त्रज्ञ (पशुशास्त्र), सहाय्यक पैदासकार, तृणविद्यावेत्ता (चारा पैदास) हि पदे रिक्त आहेत. संशोधन केंद्रामार्फत सुरु असलेल्या भातावरील संशोधन कार्यावर परिणाम होणार नाही याची खबरदारी डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली यांच्यामार्फत घेण्यात येते.

(२) हे खरे आहे.

(३) डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठामार्फत चांगल्या प्रतीचे बियाणे प्रतिवर्षी शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात येते. सन २०१९-२०२० मध्ये देखील ग्रामबिजोत्पादन योजनेंतर्गत १७१.३० क्विंटल भात बियाणे शेतकऱ्यांना पुरविण्यात आले. विद्यापीठातील शास्त्रज्ञांमार्फत शेतकऱ्यांकरीता प्रशिक्षणाचे कार्यक्रम घेण्यात आले आहेत. पालघर जिल्ह्यातील आठ तालुक्यातील शेतकऱ्यांच्या तक्रार निवारणाकरीता संबंधित तालुका कृषी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तक्रार निवारण समितीचे गठण केले जाते. कृषी संशोधन केंद्र, पालघर येथील शास्त्रज्ञ सदर समितीचे सदस्य असून कृषी विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी शेतकऱ्यांच्या शेतावर प्रत्यक्ष जाऊन त्यांच्या तक्रारींचे निराकरण केले आहे. माहे जून ते ऑक्टोबर, २०२० अखेर पर्यंत भात पिकांच्या संदर्भातील तक्रारींचे निवारण करण्यात आले आहे. या व्यतिरीक्त उन्हाळी व खरीप हंगामात घेतल्या जाणाऱ्या विविक्ष भाजीपाला पिके, फुलझाडे तसेच फळपिके यांचे व्यवस्थापन, पीक संरक्षण विशेषत: चिकू फळांची होणारी गळ यासंबंधी संशोधन करण्यात येत असून विस्ताराचे कार्य पालघर व ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांपर्यंत वेळोवेळी पोहचविण्यात येत आहे.

(४) सद्य:स्थितीत रिक्त पदे भरतीबाबत निर्बंध आहेत. सदर निर्बंध उठविल्यानंतर पालघर कृषी संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञांची रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यात अनुदानित युरीया खतांचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४६) ५९१६ (११-११-२०२०). श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या अनुदानित युरीया खतांमध्ये गैरव्यवहार झाला असल्याची लेखी तक्रार स्थानिक शेतकऱ्यांनी मा.मुख्यमंत्री, मा.कृषी मंत्री, कृषी आयुक्त, जिल्हाधिकारी, पालघर व कृषी अधिकारी, पालघर यांचेकडे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अनुदानित युरीया खताचा गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कारवाई करुन शेतकऱ्यांना देय असलेले अनुदानित युरीया खत उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२७-११-२०२०) :** (१) खरे आहे.

(२) होय, रासायनिक खताची विक्री करताना POS मशिनवर आधारकार्डाची नोंद करुन विक्रीची पावती देणे बंधनकारक आहे. परंतु, बऱ्याच विक्रेत्यांकडे पॉस मशीन व प्रत्यक्ष विक्री पावती जुळत नसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे, खत (नियंत्रण) आदेश १९८५ मधील तरतूदींचे उल्लंघन केल्यामुळे पालघर जिल्ह्यातील २१ कृषी निविष्ठा केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आलेले आहेत. विशेष मोहिमेंतर्गत, मे.एच.के. कुंभार कृषी सेवा केंद्र, डहाणू यांचे केंद्र चालकावर डहाणू पोलीस ठाणेमध्ये गुन्हा क्र. ०१८५ दाखल करण्यात आलेला आहे. तसेच, २ कृषी निविष्ठा विक्री केंद्रावर निलंबनाची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

तसेच, पालघर जिल्ह्यामध्ये आवंटनाव्दारे उपलब्ध करुन दिलेले युरीया खत शेतकऱ्यांपर्यंत उपलब्ध करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## इंदापूर (जि.पुणे) तालुक्यातील नुकसानग्रस्त मच्छिमारांना मदत देण्याबाबत

**(४७) ६०५५ (११-११-२०२०). श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदापूर (जि.पुणे) तालुक्यात दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे मदनवाडी, पळसदेव, भादलवाडी तलावांचे सांडवे फुटून तलावातील मोठे मासे तसेच लाखो रुपयांचे मत्स्यबीज वाहून गेल्याने मच्छिमारांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त मच्छिमारांना मदत देण्याबाबत पुणे जिल्हयातील मच्छिमारांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन इंदापूर (जि.पुणे) तालुक्यातील नुकसानग्रस्त मच्छिमारांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (२७-११-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) अतिवृष्टीमुळे होणाऱ्या नुकसानाबाबतची भरपाई महसूल व वन विभागामार्फत देण्यात येते. यानुषंगाने अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्याबाबतचे पंचनामे मत्स्यव्यवसाय विभाग, पुणे व महसूल विभागामार्फत करण्यात आलेले असून या अनुषंगिक पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे सास्तुर (ता.लोहारा, जि.उस्मानाबाद) येथे अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याबाबत

**(४८) ६०६५ (२०-११-२०२०). श्री.रमेश कराड :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सास्तुर (ता.लोहारा, जि.उस्मानाबाद) या गावात दिनांक १८ ऑक्टोबर, २०२० रोजी चार अज्ञात व्यक्तींनी अकरा वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी दोषी आरोपींवर कारवाई होण्याबाबत पिडीतेच्या कुटुंबियांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आरोपींवर गुन्हा दाखल होऊन त्यांचेवर कारवाई होण्याचेदृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (०२-१२-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

सदर प्रकरणी अल्पवयीन मुलीवर त्याच गावातील तीन विधीसंघर्षीत बालकांनी अत्याचार केला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी पिडीतेच्या पालकांच्या फिर्यादीवरून तीन विधीसंघर्षीत बालकांविरूध्द लोहारा पोलीस ठाणे येथे भा.दं.वि.सं. कलम ३७६, ३७६(ड,ब), ३७६(२)(आय)(जे)(एम), ३४ सह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम ३(अ), ४, ५(आय), (जे), (ग), ९(आय)(ग)(एम), १० अन्वये गु.र.क्र. २०८/२०२० दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी तीन विधीसंघर्षीत बालकांना ताब्यात घेऊन निरीक्षण गृह, उस्मानाबाद येथे ठेवण्यात आले आहे.

सद्य:स्थितीत सदर गुन्हाचा पोलीस तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे इसबावी (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील भिमा नदी पात्रातून अवैधरित्या वाळू उपसा करणाऱ्यावर कारवाई करण्याबाबत

**(४९) ६०९५ (२०-११-२०२०). श्री.प्रशांत परिचारक, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे इसबावी (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील भिमा नदी पात्रातून होणाऱ्या अवैध वाळुच्या उपसावर जिल्हा पोलीस प्रमुखाच्या पथकाने छापा टाकून लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन सहा आरोपींवर गुन्हा दाखल केल्याचे माहे सप्टेंबर, २०२० च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंढरपूर तालुक्यातील भिमा नदीवर होणाऱ्या अवैध वाळू उपसामुळे शासनाचा कोट्यवधी रुपयाचा महसूल बुडत असून याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैधरित्या वाळू उपसा करणाऱ्यांवर तसेच त्यांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२७-११-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीस प्रतिबंध करण्यासाठी महसूल विभागामार्फत पंढरपूर तालुकास्तरावर भरारी पथके कार्यान्वित करण्यात आले आहेत. माहे एप्रिल, २०२० पासून आतापर्यंत सदर पथकाव्दारे पंढरपूर तालुक्यातील १० गावामधून भिमा नदीपात्रातून अंदाजित रुपये १४,३५,०००/- किंमतीचा ३८८ ब्रास अवैध वाळूसाठा जप्त करण्यात आला आहे. तसेच ३ वाहने जप्त करुन रुपये ३,९१,५००/- इतक्या रक्कमेची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

पोलीस विभागामार्फत पंढरपूर शहर पोलीस ठाणे हद्दीत या वर्षात ऑक्टोबर, २०२० अखेर वाळूचे अवैध उत्खनन व वाहतुकीच्या प्रकरणी २९ गुन्हे दाखल केले असून ७१ आरोपींना अटक केली आहे. तसेच ३१ वाहने व रुपये ९,८५,३००/- इतक्या किंमतीची वाळू जप्त करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोरेगाव (जि.सातारा) येथे क्रीडा संकुल उभारणीकरीता निधी उपलब्ध करुन देणेबाबत

**(५०) ६१०९ (११-११-२०२०). श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरेगाव (जि.सातारा) येथे क्रीडा विषयक पायाभूत सुविधांचा अभाव असून तालुक्यातील अनेक उद्योन्मुख खेळाडूंनी विविध प्रकारच्या क्रीडा स्पर्धामध्ये भाग घेऊन देशाचे, राज्याचे तसेच जिल्हा व तालुक्याचा क्रीडा क्षेत्रात नावलौकिक वाढविला असल्याचे अनेक स्पर्धामधून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरेगाव तालुक्यात क्रीडा संकुल नसल्यामुळे तेथे क्रीडा संकुल बांधण्याबाबत लोकप्रतिनिधीसह जिल्ह्यातील क्रीडापटूंनी मागणी केल्यामुळे शासनाने कोरेगाव (सातारा रोड) येथील सर्व्हे क्रमांक ४४७ मधील १.७२ हेक्टर जागा गतवर्षी क्रीडा संकुल समितीच्या नावे वर्ग केली असल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोरेगाव, सातारा रोड येथील नियोजित जागेमध्ये अद्ययावत सुविधायुक्त तालुका क्रीडा संकुल उभारण्याकरीता सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षामध्ये निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (०३-१२-२०२०) :** (१) कोरेगांव, जि.सातारा येथील खेळाडूंनी क्रीडा क्षेत्रात देशाचा, राज्याचा व जिल्ह्याचा नावलौकिक वाढवलेला आहे.

(२) नाही.

(३) नाही.

तालुका क्रीडा संकुल कोरेगाव करीता शहरापासून जवळ जागा उपलब्ध झाल्यानंतर निधीबाबत कार्यवाही करण्याचे प्रयोजित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेंद्र भागवत**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.